दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले | RNI No. MAHMAR/2019/82605 | वर्ष ७ वे | पाने ८ | मुल्य रू. ४.०० | अंक २२० | रविवार २४ मे २०२६

| पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 | www.rashtrasahyadri.com


## सहजयोग आणि भोळेपणा...



'सहजयोग'
भाग ६०

या मार्गाला येणाऱ्या लोकांमध्ये श्रद्धा असायला पाहिजे. साधेपणा, भोळेपणा आणि परमेश्वराला जाणण्याची उत्सुकता असली, तर कुठल्याकुठे तुम्ही सगळे पोहोचू शकता. भगवे वस्त्रं घालून आणि केस काढून संत मनुष्य होता येत नाही. तसं म्हटलं तर मेंढ्यांचे रोजच केस कातरले जातात तर त्या काय संत होतात का? कपडे बदलून कोणी संत होत नाही. बाहेरचे हे प्रकार करून कोणी संत होत नाही. आपल्याकडे केवढी संत मंडळी झाली. तुकारामबुवा झाले. त्यांनी काही संन्यास घेतला नव्हता. कोणत्याही संताला संन्यास घेण्याची काही गरज नसते. कारण तो आतूनच संन्यस्त होऊन जातो. आतूनच ती वृत्ती बदलते. म्हणून बाहेरचे देखावे, बाहेरचं प्रदर्शन हे करायची काही गरज नाही. जी गोष्ट घटित व्हायची ती आतमध्ये होते त्याची जाणीव आतमध्ये होते. आता या पैकी काही लोकांना असे अनुभव येतील की थोडावेळ वाटेल आम्हाला हातावर तरंग आले, ' माताजी आम्हाला वाटलं आमच्या हातात तरंग आले' आणि मग थोड्यावेळानी असं होईल की चार-पाच जणांना नाहीत. दहा जणांना येतील चारला नाही येणार. आणि मग ती चार मंडळी ज्यांना नाही आले, ते त्वेषाने बोलू लागतील की नाही हे काही तरी खोटं आहे, अमकं आहे, तमकं आहे. मग हे दहा आहेत ते जाणार त्या चारांबरोबर. माणसाचं डोकं जे असतं ते अर्धवट असतं. हा अगदी नवीन अनुभव आहे आणि या नवीन अनुभवाला जमलं पाहिजे. तुम्ही म्हणाल एका क्षणात आणि एका मिनिटात होईल. ते होतं पण ते जमण्यासाठी तुम्हाला थोडंसं बसावं लागतं. तुमची बैठक असावी लागते. थोडीशी मेहनत करावी लागते. मेहनत ही पार झाल्यावर करायची असते. आधी नसते २५ मार्च १९७७ कळवा .अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# शिर्डीत तयार होणारे 'सूर्यास्त्र' दुश्मनांचा नक्कीच 'सूर्यास्त' करेल!

- भारत संरक्षण उत्पादनाचा सर्वात मोठा निर्यातदार बनेल
- साईबाबांचे धार्मिक क्षेत्र बनले संरक्षण खात्याचे शक्तिक्षेत्र
- केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा शिर्डीत विश्वास

### शिवरायांच्या आत्मनिर्भरतेचा वारसा

**महाराष्ट्राच्या भूमीचा गौरव करताना संरक्षण मंत्र्यांनी सांगितले की, ही भूमी छत्रपती शिवाजी महाराजांची आहे, ज्यांनी सुशासन, स्वाभिमान आणि आत्मनिर्भर अर्थव्यवस्थेचे मॉडेल निमिण केले. लढाईसाठी लागणारे साहित्य स्थानिकांकडून बनवून त्यांनी साम्राज्य उभे केले. हीच भूमिका लोकमान्य टिळकांची होती. हाच वारसा पुढे चालवत आता या महाराष्ट्राच्या भूमीने संरक्षण व्यवस्थेत खासगी उद्योगांच्या माध्यमातून एक नवा विश्वास निर्माण केला आहे.**

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** साईबाबांचे पावन धार्मिक क्षेत्र आता देशाच्या संरक्षण खात्याचे 'शक्तिक्षेत्र' म्हणून पुढे येणार आहे. शिर्डीच्या औद्योगिक वसाहतीत गणेश निबे यांच्या कारखान्यात तयार होणारे 'सूर्यास्त्र' दुश्मनांचा नक्कीच सूर्यास्त करेल, असा ठाम विश्वास देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला. संरक्षण क्षेत्रात खासगी उद्योगांची गुंतवणूक आणि संशोधन मोठ्या प्रमाणात वाढत असून, यातूनच भारत देश संरक्षण उत्पादनाचा सर्वात मोठा निर्यातदार बनेल, असे प्रतिपादन त्यांनी केले.

शिर्डी येथील औद्योगिक वसाहतीमध्ये 'निबे उद्योग समूहा'च्या वतीने विकसित करण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन आणि सीएनजी प्रकल्पाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी आयोजित दोन दिवसीय संरक्षण उत्पादनाच्या प्रदर्शनालाही मान्यवरांनी भेट दिली. या कार्यक्रमास भारताचे चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, सभापती राम शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, लेफ्टनंट जनरल संदीप जैन, अनुप सिंघल, डीआरडीओचे सेक्रेटरी डॉ. समीर कामत, केंद्रीय सचिव संजीव कुमार, ब्रह्मविहारीजी महाराज, आ.राणाजगजितसिंह, आ. मोनिका राजळे, आ. विक्रम सिंह पाचपुते, आ.आशुतोष काळे, आ.अक्षय कर्डिले यांच्यासह संरक्षण आणि उद्योग विभागाचे अधिकारी आणि प्रकल्पाचे प्रवर्तक गणेश निबे उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, खासगी उद्योगाचे सामर्थ्य जेवढे वाढेल, तेवढी देशाची सुरक्षा अधिक मजबूत होईल. केंद्र सरकारने खासगी उद्योगांना पाठबळ देण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे संरक्षण उत्पादनात त्यांचा वाटा आता २५ ते ३० टक्क्यांवर पोहोचला आहे. परवाना प्रक्रियेचे सुलभीकरण आणि स्वदेशी नीतीमुळे थेट परकीय गुंतवणुकीसही प्रोत्साहन मिळत आहे. निबे उद्योग समूहाच्या कामगिरीचे कौतुक करताना ते म्हणाले, भारतामध्ये बुद्धिमत्तेची कमतरता नाही. उपलब्ध साधनांचा उपयोग करून आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर भारत **(पान ४ वर)**

### महत्त्वाच्या घोषणा आणि मुद्दे

**४ डिफेन्स कॉरिडॉर: महाराष्ट्रात चार डिफेन्स कॉरिडॉर तयार करण्यासाठी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी मान्यता दिली. उद्योग समूह विकास: नाशिक, पुणे, नागपूर आणि अहिल्यानगर (अहमदनगर) येथे विशेष संरक्षण उद्योग समूह विकसित करण्यात येत आहेत. यामुळे महाराष्ट्र राज्य संरक्षण उत्पादनात देशात प्रथम क्रमांकाचे राज्य बनेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. गणेश निबे यांच्यासारखे तरुण नवीन तंत्रज्ञान आणून आत्मनिर्भर भारताकरिता नवा आत्मविश्वास निर्माण करत असल्याचे गौरवद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले.**



(छाया : योगेश कडसकर)

# शेतकऱ्यांना वेळेत डिझेल उपलब्ध करून द्या

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**शिर्डी :** देशभरात गेल्या आठ दिवसांमध्ये तिसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ झाल्यानंतर राज्यातील परिस्थिती बिकट होताना दिसत आहे. इंधनाचे दर वाढत असल्याने महाराष्ट्रात विशेषत: ग्रामीण भागात अनेकांनी कॅन आणि बाटल्यांमध्ये पेट्रोल-डिझेल घरी न्यायला सुरुवात केली आहे. परिणामी पेट्रोल, डिझेलचा खप अचानक वाढून वाशिम, हिंगोली, परभणी आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये पेट्रोल आणि डिझेलची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना वेळेत डिझेल उपलब्ध होईल याची दक्षता घेण्याच्या आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना **(पान ४ वर)**

### आरसी बुक पाहून डिझेल वाटप सुरू

**शेतकऱ्यांने जे काही डिझेल लागेल, ते उपलब्ध करुन द्या, असे आदेश जिल्हा प्रशासनाल दिले आहेत. पण शेतकऱ्यांच्या नावाखाली कोणी साठेबाजी करत असेल त्यांच्यावर लक्ष ठेवा. कारण काही भागात डिझेलची मागणी २० टक्के ३० टक्के वाढली आहे. अशाप्रकारे डिझेलची मागणी अचानक वाढत असेल तर काहीतरी गडबड असण्याची शक्यता आहे. मी शेतकऱ्यांना त्रास होऊ नये, अशादृष्टीने उपाययोजन करण्यास सांगितले आहे. काही ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांनी आरसी बूक बघून त्यांना डिझेल देणे सुरु केले आहे.**

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# लग्नातील आतिषबाजीत फोटोग्राफर भाजला!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** शहरातील बार्शी रोड परिसरात एका विवाह सोहळ्या दरम्यान लग्नातील आतिषबाजीमुळे गंभीर दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत एका फोटोग्राफरला गंभीर दुखापत झाली असून त्याचे लाखो रुपयांचे व्यावसायिक साहित्य देखील घटनेत जळून खाक झाले.

याप्रकरणी संबंधित लग्नसोहळ्याचा इव्हेंट आयोजक आणि फटाके व्यवस्थापन करणाऱ्यावर कठोर कारवाईची मागणी फोटोग्राफर असोसिएशनकडून करण्यात येत आहे. दरम्यान, मागील महिन्यात घडलेल्या या घटनेचे व्हिडिओ आता समोर आला आहे. तर, फोटोग्राफर असोसिएशनने जिल्हाधिकारी महोदयांची भेट घेऊन त्यांना निवेदनही दिले. बीड शहरातील आशीर्वाद मंगल कार्यालयात २८ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या विवाह सोहळ्या दरम्यान मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. ही फटाकेबाजी आवश्यक सुरक्षा उपाय व नियमांचे पालन न करता करण्यात आल्याचा आरोप जखमी तरुणाच्या कुटुंबाने केला. घटनेत फोटोग्राफर अभिषेक कदम हा गंभीररीत्या भाजला **(पान ४ वर)**

# पुणे बनले नीट पेपरफुटीचा केंद्रबिंदू?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

- **आणखी एका प्राध्यापिकेला सीबीआयची अटक**
- **एनटीएच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह**

**पुणे :** वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील नीट पेपरफुटी प्रकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) आणखी एका प्राध्यापिकेला अटक केली आहे. बुधवार पेठेतील शेठ हिरालाल सराफ प्रशालेच्या मुख्याध्यापिका आणि फिजिक्स विषयाच्या शिक्षिका मनीषा हवालदार यांना अटक करण्यात आली असून, त्या राष्ट्रीय परीक्षा संस्थेसाठी (एनटीए) फिजिक्सचा प्रश्नपत्रिका संच तयार करण्याच्या कामात सहभागी होत्या.

या आधी शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयातील बायोलॉजी विषयाच्या प्राध्यापिका मनीषा मांढरे यांना अटक करण्यात आली होती. तर डेक्कन परिसरातील मोटेगावकर क्लासेसमध्ये केमिस्ट्री शिकवणारे पी. व्ही. कुलकर्णी यांनाही सीबीआयने ताब्यात घेतले आहे. कुलकर्णी यांच्याकडे केमिस्ट्री प्रश्नपत्रिकेचे मराठी भाषांतर करण्याची जबाबदारी होती.




विशेष म्हणजे फिजिक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी या तिन्ही विषयांसाठी एनटीएमध्ये कार्यरत असलेले हे तिन्ही शिक्षक पुण्यातील शिवाजीनगर, डेक्कन आणि बुधवार पेठ या अवघ्या दोन ते तीन किलोमीटरच्या परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत होते. त्यामुळे इतक्या मोठ्या देशात हजारो शिक्षक उपलब्ध असताना पुण्यातीलच शिक्षकांची निवड का करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मनीषा हवालदार या गेली ३४ वर्षे फिजिक्स शिकवत होत्या आणि त्या एनटीएमध्ये कार्यरत असल्याची माहिती त्यांच्या सहकाऱ्यांनाही नव्हती, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे या नियुक्त्यांमागे कोणाचा प्रभाव होता? एनटीएतील अधिकाऱ्यांचा यात सहभाग होता का? याआधीही अशा प्रकारे प्रश्नपत्रिका फुटल्या होत्या का? असे अनेक गंभीर प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

दरम्यान, या प्रकरणात केवळ पेपरफोडी करणारेच नव्हे तर लाखो रुपये देऊन प्रश्नपत्रिका विकत घेतल्याचा संशय असलेले काही डॉक्टर आणि पालकही सीबीआयच्या चौकशीच्या फेऱ्यात आले आहेत. पुणे, लातूरसह विविध शहरांमधील डॉक्टरांची चौकशी सुरू असून, स्वतःचे हॉस्पिटल पुढे चालवण्यासाठी मुलांनाही डॉक्टर बनवण्याच्या उद्देशाने काहींनी हा मार्ग अवलंबल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.देशभरात तपास सुरू असला तरी या घोटाळ्याचा केंद्रबिंदू पुणे असल्याचं चित्र स्पष्ट होत आहे. त्यामुळे या शिक्षकांची एनटीएमध्ये नियुक्ती नेमकी कोणाच्या शिफारशीवर झाली, हा प्रश्न अधिक **(पान ४ वर)**

# कॉक्रोच पार्टीचे एक्स, इन्स्टाग्रामनंतर आता वेबसाईटही बंद!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**मुंबई :** गेल्या सात ते आठ दिवसांमध्ये संपूर्ण सोशल मिडिया आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या अभिजीत दिपके यांच्या कॉक्रोच जनता पार्टीचे अधिकृत संकेतस्थळ बंद केले आहे. या संकेतस्थळावर येऊन कॉक्रोच जनता पार्टीमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी करता येत होती. मात्र, गेल्या दोन ते तीन दिवसांमध्ये आधी कॉक्रोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट आणि नंतर इन्स्टा अकाऊंट बंद करण्यात आले होते. एक्स आणि इन्स्टाग्राम अकाऊंटवर कॉक्रोच जनता पार्टीला तुफान प्रतिसाद मिळाला होता. अवघ्या काही दिवसांमध्ये या दोन्ही समाज माध्यमांवर कॉक्रोच जनता पार्टीचे लाखो सदस्य झाले होते. मात्र, कॉक्रोच जनता पार्टीचे एक्स अकाऊंट, इन्स्टा आणि आता वेबसाईट बंद झाल्याने त्यांना संबंधित यंत्रणांनी मोठा झटका दिला आहे.

कॉक्रोच जनता पार्टीचे इन्स्टा आणि ट्विटर अकाऊंट बंद झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी निदर्शने करण्याचा इशारा दिला होता. मात्र, अभिजीत दिपके यांनी आपल्या समर्थकांना ही चूक टाळण्याचा सल्ला दिला होता. तसेच तशी कोणतीही निदर्शने झाल्यास त्याच्याशी आपला संबंध नसल्याचे स्पष्ट केले होते. समर्थकांनी घाईघाईने कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नये. ज्यामुळे आपल्या चळवळीवर परिणाम होईल. सरकारला आपण एक चूक करावी, हेच हवं आहे. त्यामुळे आपण तसं करु नये. ही मोठी लढाई आहे आणि आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे, असे अभिजीत दिपके यांनी म्हटले होते.

# रस्त्यावरील व दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' : मंत्री तटकरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** रस्त्यावर राहणाऱ्या, अनाथ, एकल आणि दुर्लक्षित बालकांच्या पुनर्वसनासाठी 'फिरते पथक' पथदर्शी योजना सहा जिल्ह्यात यशस्वीपणे राबविण्यात आली होती. या पथदर्शी योजनेच्या धर्तीवर २२ जिल्ह्यातील ३१ महानगरपालिकांमध्ये फिरते पथक योजनेसाठी प्रस्ताव मागविण्याचे निर्देश महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. मंत्रालयात 'फिरते पथक' योजनेसंदर्भात आयोजित बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीस संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या योजनेअंतर्गत मोबाईल वाहनांच्या माध्यमातून रस्त्यावरील बालकांना पौष्टिक आहार, आरोग्य सेवा, शिक्षण, मनोरंजन सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच बालकांची आधार नोंदणी, समुपदेशन, मानसिक आधार आणि पालकांमध्ये शिक्षणाबाबत जनजागृती करण्यात येते. रस्त्यावरील बालकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

यापूर्वी नाशिक, पुणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे आणि नागपूर या सहा जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविण्यात आला होता. या प्रकल्पाद्वारे आतापर्यंत ३ हजार ८०३ बालकांना शैक्षणिक, आरोग्यविषयक, मनोरंजन तसेच आहार सुविधा पुरविण्यात आल्या असून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात यश आले आहे. त्यामध्ये पुणे जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार ६७९, मुंबई शहरात ८१०, ठाण्यात ७५०, नाशिकमध्ये २८५ आणि नागपुरात २७९ बालकांचा



- राज्यातील २८ महानगरपालिका क्षेत्रांसह मुंबई शहर, पूर्व उपनगर आणि पश्चिम उपनगर अशा एकूण ३१ फिरत्या पथकांची अंमलबजावणी प्रस्तावित करण्यात आली आहे.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, स्वयंसेवी संस्थांना मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमांतर्गत नोंदणी, निधी पोर्टलवरील नोंद, मागील तीन वर्षांचे लेखापरीक्षण अहवाल तसेच संस्थेची घटना आणि नियमावली सादर करणे आवश्यक राहील. तसेच फिरत्या पथकांसाठी नियुक्त वाहनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि ट्रॅकिंग सिस्टीम बसविणे बंधनकारक करण्यात येणार असून ही यंत्रणा संबंधित पोलीस विभागाच्या समन्वयाने कार्य करेल.

समावेश आहे. संबंधित संस्थांनी बाल कल्याण समिती, बाल हक्क आयोग आणि स्थानिक पोलीस प्रशासनाला आपल्या कार्यक्षेत्राची माहिती देणेही आवश्यक राहणार आहे. संस्थांकडून नव्याने अर्ज मागविण्यात येणार असून संपूर्ण प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधित संस्थेचा करार रद्द करून पर्यायी संस्था नियुक्त करण्याची तरतूदही करण्यात आली आहे.

# उच्च शिक्षणाचे खासगीकरण आणि गुणवत्तेचा बळी?

संपादकीय

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० देशातील उच्च शिक्षणाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी कटिबद्ध आहे. २०३५ पर्यंत उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे आणि देशातील ८०० जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक असमानता दूर करण्याचे उदात्त हेतू या धोरणामागे आहेत. जयपूरमधील ३५ विद्यापीठे आणि बेंगळुरू मधील १,१०६ महाविद्यालये एका बाजूला, तर देशातील ५० टक्के जिल्ह्यांमध्ये एकही विद्यापीठ नसणे हे भीषण वास्तव दुसऱ्या बाजूला आहे. ही दरी सांधण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात बहुविद्याशाखीय उच्च शैक्षणिक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे, यात शंकाच नाही. मात्र, या उद्दिष्टाच्या नावाखाली महाराष्ट्र सरकारने अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे रूपांतर थेट 'खासगी विद्यापीठांत' करण्यासाठी जी समिती स्थापन केली आहे, त्या निर्णयावर आज गंभीर आत्मपरीक्षण करण्याची गरज निर्माण झाली आहे. 'समूह विद्यापीठांचा' पर्याय उपलब्ध असताना, अनुदानित महाविद्यालयांना खासगी विद्यापीठांचा दर्जा देणे कितपत उचित आणि व्यावहारिक ठरेल, हा खरा प्रश्न आहे.

वर्ष २०२६ च्या सुरुवातीस महाराष्ट्रात आधीच ८९ हून अधिक विद्यापीठे कार्यरत आहेत, ज्यात ३५ खासगी विद्यापीठांचा समावेश आहे. २०२५ मध्ये या संख्येत झपाट्याने वाढ झाली असून, २०२४-२०२९ च्या विस्तार योजनेअंतर्गत १,४९९ नवीन महाविद्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. यावरून राज्याचा उच्च शिक्षण क्षेत्र विस्तारत असल्याचे स्पष्ट दिसते. सार्वजनिक विद्यापीठांवर असलेला संलग्न महाविद्यालयांचा प्रचंड भार कमी करणे हा यामागील एक हेतू असू शकतो. परंतु, भार कमी करण्याच्या नादात आपण गुणवत्तेशी तडजोड तर करत नाही ना? अनुदानित महाविद्यालयातून रूपांतरित झालेली ही नवीन खासगी विद्यापीठे स्वायत्तता सांभाळण्यास आणि संपूर्ण विद्यापीठ चालविण्यास खरोखर सक्षम आहेत का, हा मूळ प्रश्न अनुत्तरितच राहतो.महाविद्यालयाचे विद्यापीठात रूपांतर होताच, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार त्यांना व्यवस्थापन परिषद, विद्वत परिषद, अभ्यास मंडळे आणि सिनेट (अधिसभा) यांसारखी जडजंबाल प्राधिकरणे गठीत करावी लागतील. ही प्राधिकरणे चालविण्याचा आर्थिक बोजा अफाट असेल. सर्वात मोठा फटका बसेल तो प्राध्यापकांच्या मूळ कर्तव्याला, म्हणजेच अध्यापनाला. महाविद्यालयीन शिक्षकांचे मुख्य काम विद्यार्थ्यांशी संवाद साधणे आणि त्यांना शिकवणे हे असते. परंतु, स्वायत्त विद्यापीठ झाल्यामुळे प्रवेश प्रक्रियेपासून ते थेटपदवीदानापर्यंतच्या सर्व प्रशासकीय जबाबदाऱ्या शिक्षकांच्या खांद्यावर येतील. प्रश्नपत्रिका काढणे, त्यांचे पुनरावलोकन (मॉडरेशन), परीक्षांचे आयोजन, मूल्यांकन आणि वेळेत निकाल लावणे ही चक्रव्यूहासारखी कामे सेमिस्टर पद्धतीमुळे वर्षातून दोनदा करावी लागतील. ही कामे कालमर्यादित असल्याने शिक्षकांना 'विद्यार्थी-केंद्रित' अध्यापनासाठी नक्की किती वेळ मिळेल? घटक चाचण्या, सेमिनार आणि संशोधन प्रकल्पांचे काय होणार? शिक्षण ही जर केवळ प्रशासकीय कसरत बनली, तर विद्यार्थ्यांच्या पदरी फक्त पदव्या पडतील, ज्ञान नाही.

नवीन शैक्षणिक धोरणातील बहुविद्याशाखीय संकल्पनेनुसार विद्यार्थ्याला मेजर, मायनर विषयांसोबतच कौशल्यविकास, व्यावसायिक अभ्यासक्रम, मूल्यवर्धक अभ्यासक्रम आणि भारतीय ज्ञान प्रणाली यांसारख्या घटकांवर 'क्रेडिट्स' मिळवणे बंधनकारक आहे. आज बहुतांश अनुदानित महाविद्यालयांमध्ये मुख्य विषयांचे शिक्षक उपलब्ध असले, तरी उर्वरित बहुतांश घटकांसाठी तज्ज्ञ प्राध्यापकच नाहीत. परिणामी, या विषयांचे अध्यापन आणि मूल्यांकन अत्यंत थातूरमातूर पद्धतीने चालले आहे. त्यात भर म्हणजे, आजच्या घडीला राज्यातील अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तब्बल अर्ध्याहून अधिक पदे रिक्त आहेत! अशा रिक्त पदांच्या 'अंधेरी'त खासगी विद्यापीठांचा गाडा कोणाच्या भरवशावर ओढला जाणार? राज्यातील सार्वजनिक आणि पारंपरिक विद्यापीठांची अवस्थाही काही फारशी भूषणावह नाही. महाराष्ट्रातील ११ पारंपरिक विद्यापीठांपैकी बऱ्याच ठिकाणी प्रमुख विषयांचे स्वतंत्र विभाग कार्यरत नाहीत, तर काही विभागांना विनाअनुदानित तत्त्वावर चालवले जात आहे. जर राज्याची मुख्य सार्वजनिक विद्यापीठेच संसाधनांअभावी अशक्त झाली असतील, तर नव्याने निर्माण होणारी खासगी विद्यापीठे कोणती जादू करणार?

या सर्व प्रक्रियेत सर्वात मोठा धोका आहे तो उच्च शिक्षणाच्या व्यापारीकरणाचा. जागतिक दर्जाचे निकष पूर्ण करण्यासाठी पायाभूत सुविधा, प्राध्यापक आणि संशोधनावर कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल. ही गुंतवणूक करणाऱ्या खासगी संस्था निव्वळ 'सामाजिक बांधिलकी' म्हणून काम करतील, ही भाबडी आशा आहे. गुंतवणुकीतून नफा कमविणे हाच या संस्थांचा मुख्य व्यावसायिक उद्देश असणार. साहजिकच, या विद्यापीठांचे शैक्षणिक शुल्क सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असेल. परिणामी, खेड्यापाड्यातील, गरीब, शेतकरी आणि कष्टकरी वर्गातील गुणवंत व होतकरू विद्यार्थी या उच्च शिक्षणापासून पूर्णपणे वंचित राहतील.प्रस्तावित खासगी विद्यापीठांना स्वतः ची 'पदवी' देण्याचे पूर्ण अधिकार असतील. व्यावसायिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी ही विद्यापीठे गुणवत्तेपेक्षा 'विद्यार्थी संख्या' आणि महसूल वाढवण्यावर अधिक भर देण्याची दाट शक्यता आहे. यामुळे शैक्षणिक दर्जाचे संतुलन कोलमडेल.विशेष म्हणजे, राज्य सरकारने २०२३ पासून 'समूह विद्यापीठ' ही एक अत्यंत व्यावहारिक संकल्पना आणली आहे, ज्यामध्ये एकाच जिल्ह्यातील २ ते ५ महाविद्यालये एकत्र येऊन विद्यापीठ स्थापन करू शकतात. या योजनेला महाराष्ट्रात अद्याप अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला असून, केवळ चारच समूह विद्यापीठे स्थापन झाली आहेत. या चांगल्या पर्यायाचा पूर्ण क्षमतेने विस्तार करण्याऐवजी, सरकारने प्रत्येक अनुदानित महाविद्यालयाला खासगी विद्यापीठाची सनद बहाल करण्याचा घाट घालणे अनाकलनीय आहे.

महाराष्ट्र सरकारने नेमलेली समिती या महाविद्यालयांचे रूपांतर करताना कर्मचाऱ्यांचे वेतन, संमती, ज्येष्ठता, सेवाशर्ती आणि शुल्क नियंत्रण यावर शिफारसी देईलच; परंतु मूळ संकल्पनाच त्रुटींनी भरलेली आहे. त्यामुळे केवळ कागदावर संख्यात्मक वाढ दाखवण्यासाठी गुणवत्तेचा बळी देणे राज्याला परवडणारे नाही. महाराष्ट्र सरकारने या आत्मघातकी निर्णयाचा आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खासगी विद्यापीठात रूपांतर करण्याच्या संकल्पनेचा गांभीर्याने पुनर्विचार करावा, हीच काळाची गरज आहे. अन्यथा, उच्च शिक्षणाची ही वाटचाल सामान्य विद्यार्थ्यांचा 'सूर्यास्त' ठरू शकते.

# धामोरी येथील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील धामोरी येथील अखंड हरिनाम सप्ताहाची देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने भक्तिमय वातावरणात काल्याची दहीहंडी फोडून सांगता करण्यात आली.

धामोरी अखंड हरिनाम सप्ताहामुळे येथील परिसर टाळ मृदुंगाच्या गजराने सात दिवस दुमदुमून गेला होता . अध्यात्मिक अधिष्ठान असलेले श्री समर्थ सद्गुरु किसनगिरी बाबा यांच्या आशीर्वादाने व वैकुंठवासी ह भ प नाशिकेत महाराज कोरेकर यांच्या कृपाशीर्वादाने सुरू झालेला हा अखंड हरिनाम सप्ताह महंत भास्करगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वीस वर्षांपासून ही सप्ताह परंपरा जपत धामोरी ग्रामस्थांनी अध्यात्मिक ज्ञान यज्ञ चालू ठेवला आहे.

या सोहळ्याची सांगता श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी हभप स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या काल्याचे कीर्तनाने भाविकांच्या उपस्थित उत्साहात सप्ताहाची सांगता झाली. या सप्ताह साठी योगदान देणाऱ्या दात्यांचा यावेळी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराजांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

सप्ताह काळात श्री संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के,आमदार सौभाग्यवती रत्नमालाताई विठ्ठलराव लंघे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश शेटे,भाजप वैद्यकीय आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब कोलते, नेवासा नगरपंचायतचे गटनेते महेश लोखंडे, भाजप तालुका अध्यक्ष मनोज अण्णा पारखे,भाजप अध्यात्मिक आघाडीचे जिल्हाप्रमुख नानासाहेब डौले, शिरसगाव भाजपा बूथ अध्यक्ष सचिन गवांदे,नगरसेवक अंकुश म्हस्के, संदीप सरकाळे आदी मान्यवरांनी सप्ताह दरम्यान भेट दिली.

सांगता प्रसंगी गुरुवर्य स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडून आठ दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात आली.



# शिरसगावच्या स्मिता जमादार यांनी जिंकली घरगणनेची शर्यत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** 'जनगणना २०२७' च्या राष्ट्रीय मोहिमेत श्रीरामपूर तालुक्याने बाजी मारली असून, शिरसगाव ग्रामीणच्या प्रगणक स्मिता गोकुळसिंग जमादार यांनी संपूर्ण तालुक्यात सर्वप्रथम घरगणना पूर्ण करून इतिहास रचला आहे. गट क्र. ००८५ मधील घरांची नोंदणी अचूक व विक्रमी वेळेत पूर्ण केल्याबद्दल तहसील कार्यालयात नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहायक महसूल अधिकारी निलेश इंगळे, पर्यवेक्षक राजेश घोरपडे यांच्याहस्ते त्यांचा सहपरिवार गौरव करण्यात आला. देशभरात सध्या जनगणनेच्या पूर्वतयारीचा धडाका सुरू असताना, हे काम वेळेत व बिनचूक पार पाडणे हे प्रत्येक प्रगणकापुढील मोठे आव्हान आहे. मात्र स्मिता जमादार यांनी नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि चिकाटीच्या जोरावर हे आव्हान लीलया पेलले. त्यांच्या या तत्परतेमुळे श्रीरामपूर तालुक्याच्या लौकिकात मोलाची भर पडली आहे.

**वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळेच यश**

हे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडताना प्रांताधिकारी किरण सावंत पाटील,तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांची प्रेरणा मिळाली. तर नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, सहाय्यक महसूल अधिकारी निलेश इंगळे, ट्रेनर योगेश राणे, गणेश पिंगळे, पर्यवेक्षक राजेश घोरपडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याने हे क्लिष्ट काम मी वेळेआधीच पूर्ण करू शकले.

– स्मिता जमादार, प्रगणक, शिरसगाव

**प्रगणकांना मार्गदर्शनासाठी सदैव तत्पर**

प्रगणक हे जनगणनेचे खरे शिलेदार आहेत. अचूक माहिती, लोकांशी संवाद आणि प्रामाणिक काम हीच यशाची गुरुकिल्ली आहे. प्रत्येक प्रगणकाने आत्मविश्वासाने काम करावे, मार्गदर्शनासाठी आम्ही माष्टर ट्रेनर्स नेहमी त्यांच्या पाठीशी आहोत.

- गणेश पिंगळे, माष्टर ट्रेनर



श्रीरामपूर : प्रगणक स्मिता जमादार यांनी घरांची नोंदणी अचूक व विक्रमी वेळेत पूर्ण केल्याबद्दल नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर, निलेश इंगळे, राजेश घोरपडे, विजय काटकर यांनी सत्कार केला. (छाया : संदिप पाळंदे)

# गोवत्स श्री राधाकृष्ण महाराज यांच्या श्रीमद भागवत कथेला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** राजस्थान जोधपूर येथील गोवत्स परमपूज्यनीय राधाकृष्ण महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून नेवासा तालुक्यातील देवगड येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेला भाविकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.भागवत कथा ऐकण्यासाठी मनामध्ये इच्छा आणि श्रद्धा बलवान असली पाहिजे,अंतर्मनातून केलेल्या भक्तीने मनुष्य जीवाला खऱ्या अर्थाने समाधानाची प्राप्ती होत असते म्हणून समाधानाच्या प्राप्तीसाठी अंतर्मनातून

भगवंताची भक्ती करा असे आवाहन राधाकृष्ण महाराज यांनी कथा सोहळ्यातील तिसरे पुष्प गुंफतांना केले. कथेच्या तिसऱ्या दिवशी शनिवारी सकाळी ९ ते १२ यावेळेत झालेल्या श्रीमद भागवत कथा सोहळयात गोवत्स राधाकृष्ण महाराज यांनी आपल्या मधुर वाणीतून अभ्यासपूर्ण निरूपण केले. त्यांच्या रसाळ वाणीतून सुरू असलेल्या कथेला महिला पुरुष, युवक- युवती, बालके बालिका पंचक्रोशीतील भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.कथा प्रसंगी बोलताना राधाकृष्ण महाराज म्हणाले की आजची तरुणाई मोबाईलच्या विळख्यात अडकत चालली असून त्यामुळे संस्कार, कुटुंब व्यवस्था आणि अध्यात्मापासून दूर जात आहे. व्यसनांपासून दूर राहून युवकांनी भक्ती, संस्कार आणि चांगल्या विचारांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. आई-वडिलांनी आपल्या मुलांना लहानपणापासून चांगले संस्कार त्यासाठी देणे गरजेचे आहे,मनुष्य जीवाला खऱ्या अर्थाने समाधानाची प्राप्ती हवी असेल तर त्यांनी अंतर्मनातून भगवंताची भक्ती केली पाहिजे दिले असा संदेश दिला. झालेल्या कथेप्रसंगी त्यांनी राजा परीक्षित यांना मिळालेल्या सर्पदंशाच्या शापाचा प्रसंग, भगवान कपिल, हिरण्यकश्यपू तसेच देवहुती यांच्या कथांचे सुंदर विवेचन करत भागवत धर्माचे महत्त्व भाविकांना पटवून सांगितले

भागवत कथेला सीमा नाही, ती अथांग आहे. भागवत कथा माणसाला आत्मिक शांती, ज्ञान आणि भक्तीचा मार्ग दाखवते असेही राधाकृष्ण महाराज यांनी सांगितले. कथा समाप्तीप्रसंगी राधाकृष्ण महाराज यांनी कथेच्या चौथ्या दिवशी होणाऱ्या श्रीकृष्ण जन्म सोहळ्याची माहिती देत श्रीकृष्ण जन्मोत्सव हा भक्तांसाठी आनंद आणि भक्तीचा दिव्य सोहळा असल्याने भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या श्रीमद भागवत कथा सोहळयाच्या प्रसंगी गुरुदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्रसंत भास्करगिरी महाराज, उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, अयोध्या येथील मधुकरबाबा,त्रिवेणीश्वर देवस्थानचे महंत स्वामी रमेशानंदगिरी महाराज, घोगरगाव येथील जात बहिरा देवस्थानचे प्रमुख बालब्रम्हचारी विश्वनाथगिरी महाराज, डॉ.जनार्दन मेटे महाराज, मारोती महाराज काळे, नारायण महाराज ससे, रामनाथ महाराज पवार, गणपत महाराज आहेर, देवगडचे संतसेवक बाळू महाराज कानडे, लक्ष्मीनारायण महाराज जोंधळे, यांच्यासह वारकरी संप्रदायातील सेवेकरी, भाविक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. संतसेवक बजरंग विधाते यांनी कथा सोहळा कार्यक्रम प्रसंगी सूत्रसंचालन केले. यावेळी उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.





पुरुषोत्तम अधिक मासाच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पीठ येथे सुरू असलेल्या श्री विठ्ठल भक्ती रस महोत्सवात आयोजित श्रीमद भागवत कथा सोहळयात बोलतांना गोवत्स राधाकृष्ण महाराज समवेत उपस्थित भाविक.
**(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

# मुसळवाडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना दोन महिन्यांत सुरू करा : आ. हेमंत ओगले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील मुसळवाडी येथील मुसळवाडीसह अन्य नऊ गावांसाठीची प्रादेशिक जलजीवन पाणीपुरवठा योजना गेल्या अनेक वर्षांपासून बंद असल्याने निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर आमदार हेमंत ओगले यांनी आढावा बैठक आयोजित केली. यावेळी संबंधित पाटबंधारे, महावितरण, महसूल तसेच प्रादेशिक जलजीवन विभागाच्या अधिकाऱ्यांना योजना कायमस्वरूपी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले.

आ. हेमंत ओगले म्हणाले की, मुसळवाडीसह ९ गावांतील ग्रामस्थांसाठी ही पाणी योजना अत्यंत महत्त्वाची असून, ती बंद असल्यामुळे नागरिकांना विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामस्थांनी योजना सुरू करण्याची मागणी केल्यानंतर तातडीने दखल घेत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. संबंधित विभागांनी समन्वय साधून पुढील दोन महिन्यांत योजना कायमस्वरूपी सुरू करावी, अशा सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीस जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस सुरेश निमसे, माजी सरपंच अमृत धुमाळ, अहिल्यानगर एमजीपी मेकॅनिकल विभागाचे कार्यकारी अभियंता बिवाल, श्रीरामपूर जलजीवन विभागाचे अभियंता पवार, राहुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तायडे, देवळाली प्रवरा पाटबंधारे विभागाचे उपअभियंता अच्युत गीते, मुसळवाडी पाटबंधारे विभागाच्या शाखाधिकारी अश्विनी पटारे, टाकळीमिया महावितरण विभागाचे अभियंता शरद विटनोर, पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाचे शाखा अभियंता परदेशी, टाकळीमिया मंडल अधिकारी बाळकृष्ण जाधव यांच्यासह नितीन धुमाळ, विक्रांत धुमाळ, ॲड. निलेश धुमाळ, मच्छिंद्र धुमाळ, सचिन धुमाळ, दगडू भुजाडी, जालिंदर माने, भूषण घोलप आदींसह ९ नावांतील सरपंच, ग्रामसेवक, ग्राम महसूल अधिकारी, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# क्षेपणास्त्र प्रकल्प उद्घाटन सोहळ्याचे सोनेवाडी प्रशासनाला निमंत्रणच नाही

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील सोनेवाडी हद्दीतील जवळपास ३०० एकर जमीन एमआयडीसीसाठी हस्तांतरित झाली आहे. या एमआयडीसीला सोनेवाडी नाव देण्यासाठी तालुक्यातून अनेक प्रयत्न झाले मात्र नाव तर नाहीच परंतु काल झालेल्या क्षेपणास्त्र संकुल व तोफगोळा उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटनालाही स्थानिक प्रशासनाला साधं निमंत्रणही मिळाले नाही ही दुर्दैवी बाब आहे. यामुळे तरुण व सुशिक्षित बेकार वर्गामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण पसरले आहे.

या माध्यमातून रोजगार, गाव व परिसरातील रस्ते तसेच ग्रामपंचायतीला मिळणारा कराचा प्रश्न देखील उपस्थित झाला आहे. कार्यक्रमाचं निमंत्रण मिळालं नसल्याची बातमी सोशल मीडियावर जेव्हा फिरकली तेव्हा अनेकांनी आपली तीव्र प्रतिक्रिया ग्रुपवर व्यक्त केले. निमंत्रण पत्रिकेवर देखील सोनेवाडी एमआयडीसीचा साधा उल्लेख ही दिसला नाही.

अनेक तरुणांनी रोजगार उपलब्ध होईल या दृष्टीने या प्रकल्पाकडे आपले लक्ष केंद्रित केले होते मात्र आता त्यांची आशा पुसट झाल्याचे चिन्ह दिसत आहे. सदर प्रकल्पाचे काम सुरू असताना गावातील तरुणांनी या संदर्भात तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती तेव्हा आपल्या ग्रामपंचायतीला व्यवसायिक कर व गावातील तरुणांना रोजगाराच्या संधी दिल्या जातील असा शब्द देखील प्रशासनाच्या वतीने देण्यात आला होता. मात्र याचा विसर आता या प्रकल्पाला पडला असल्याचे चित्र काल पाहण्यास मिळाले.सायंकाळी या संदर्भात हनुमान मंदिरासमोर तरुणांनी एकत्र येत या संदर्भात आक्रमक पवित्रा घेण्याचे ठरवले आहे.यासंदर्भात सर्वांनी राजकारण सोडून भविष्याच्या प्रश्नासाठी एकत्र यावे असे आवाहन सोनेवाडी एमआयडीसी कृती समितीचे अध्यक्ष किशोर जावळे यांनी केले आहे.

# मढेवडगाव पंचक्रोशीचा आधारवड हरपला, गाव आज अक्षरशः पोरकं झालं

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

श्रीगोंदा तालुक्यातील मढेवडगाव येथील एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्व कै नामदेवराव तात्या शिंदे यांचे नुकतेच निधन झाले मढेवडगावच्या मातीत जन्माला आलेलं गोरगरिबांच्या सुखदुःखात कायम धावून जाणारं सहकार, समाजकारण आणि राजकारणात आपल्या शब्दाचा दरारा ठेवणारं धडाडीचं व्यक्तिमत्व आज काळाच्या पडद्याआड गेल्यानं संपूर्ण मढेवडगाव पंचक्रोशीवर शोककळा पसरली आहे. मढेवडगावचे लोकनियुक्त सरपंच मा. प्रमोद शिंदे यांचे आदरणीय पिताश्री, नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक आणि हजारो सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचा माणूस असलेले हे मोठं नाव आज अचानक निघून गेल्यानं गावच्या प्रत्येक डोळ्यात पाणी आलं आहे.

गावात कुणाचं भांडण असो गरिबाच्या घरात अडचण असो किंवा एखाद्या लेकराच्या संसाराचा प्रश्न असोचला तात्यांकडं जाऊ एवढा शब्द निघाला की अर्धा प्रश्न तिथंच मिटायचा. कारण त्यांच्या शब्दात माया होती न्याय होता आणि माणुसकीचा ओलावा होता. मोठेपणा अंगात असूनही माणूस मात्र अगदी जमिनीवरचा गोरगरिबांच्या खांद्यावर हात ठेवून घाबरू नकास रे मी हाय म्हणणारा आधारवड आज निघून गेलाय. त्यांच्या जाण्यानं गावातली जुनी सावली हरपल्याची भावना प्रत्येकाच्या मनात दाटून आली आहे. आणि आज तात्यांच्या पावलावर पाऊल ठेवत मढेवडगावचे लोकनियुक्त सरपंच मा. प्रमोद शिंदे हे देखील सर्वसामान्यांना न्याय देण्याचा, गोरगरिबांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. वडिलांकडून मिळालेली माणुसकीची शिकवण, गावाबद्दलची तळमळ आणि प्रत्येकाला आपलसं मानण्याची वृत्ती त्यांनी जपली आहे. म्हणूनच आज गावातील अनेकांना तात्या गेले पण त्यांची सावली अजून गावावर आहे अशी भावना होत आहे.

मढेवडगावच्या राजकारणात, सहकारात आणि सामाजिक चळवळीत तात्यांनी दिलेलं योगदान आयुष्यभर विसरता येणार नाही. गावातल्या अनेक कुटुंबांच्या संसाराला त्यांनी हात दिला अनेकांच्या डोळ्यातलं पाणी पुसलंआणि अनेक लेकरांना



बापाच्या मायेचा आधार दिला. आज गावातल्या चौकाचौकात फक्त त्यांच्याच आठवणी बोलतायतवृद्धांच्या डोळ्यात अश्रू आहेत तर तरुणांच्या मनात हुरहूर आहे असं माणूस पुन्हा होणं नाही हीच भावना प्रत्येकाच्या तोंडून निघत आहे.

त्यांच्या जाण्यानं शिंदे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण मढेवडगाव पंचक्रोशी त्यांच्या दुःखात सहभागी झाली आहे. ईश्वर त्यांच्या पुण्यात्म्यास आपल्या चरणी स्थान देवो भावपूर्ण श्रद्धांजली = माझी राजकीय जीवनाची सुरुवात स्व. शिवाजी बापू नागवडे यांच्या आशीर्वादाने व स्व. नामदेव तात्या शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली एक सुशिक्षित तरुण राजकारणामध्ये समाजकारणामध्ये पुढे येत असलेले पाहून तात्यांनी स्वतः मागे थांबून मला संधी दिली दिलेल्या संधीचे सोनं करत असताना तात्यांच्याच मार्गदर्शनाखाली आतापर्यंतची माझी यशस्वी वाटचाल राहिलेली आहे. तात्यांच्या जाण्याने आमचा मायेचा आधार हरपला

**सुभाष शिंदे मा व्हॉ. चेअरमन**
**संचालक नागवडे सहकारी कारखाना**

सहकार आणि तात्या हे अतूट नातं होते संस्थेचे अध्यक्ष म्हणून सहकारामध्ये काम करत असताना मला नेहमीच तात्यांचे मार्गदर्शन व आशीर्वाद लाभले आम्हाला कोणतीही अडचण आली तर तात्या हीच त्याची सोडवणूक होती तात्या जाण्याच्या एक दिवस आधी त्यांनी स्वतः मला फोन करून शेवटचे मार्गदर्शन केले ही आयुष्यातली कधीही न विसरणारी गोष्ट आहे तात्यांच्या जाण्याने आमच्या डोक्यावरचा आशीर्वाद मायेचे छत्र कायमचे हरपले.

**बापूसाहेब वाबळे अध्यक्ष मढेवडगाव सोसायटी**

माझा राजकीय जीवनाची सुरुवात तात्यांमुळेच तरुणपणामध्ये तात्यांनी संधी दिली म्हणूनच आजपर्यंत ३५ वर्षापासून संस्थेचा संचालक व काही काळ अध्यक्ष म्हणून काम करत असताना तात्या हेच आमचे प्रेरणास्थान होते तात्या गेले सगळं संपलं यापुढे तात्यांच्या पश्चात सदैव तात्यांच्या कुटुंबासोबत राहील.

भीमराव फरकांडे
मा. अध्यक्ष/ वि. संचालक सोसायटी मढेवडगाव

माझ्या जन्माच्या आधी तात्यांचा राजकीय सामाजिक जीवनप्रवास सुरू झालेला होता त्यामुळे ज्यावेळेस आम्हाला समज आली तेव्हापासून गोरगरीत समाजासाठी अहोरात्र राबणारे व्यक्ती म्हणजे तात्या तात्यांचा तोच वसा आणि वारसा घेऊन लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे व आम्ही सर्वजण भविष्यामध्ये तात्यांनी दिलेला आदर्श घेऊन काम करू हीच खरी तात्यांना श्रद्धांजली होईल

**राहुल साळवे ,माजी उपसरपंच**


हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# ग्रीनफिल्ड महामार्गग्रस्त शेतकऱ्यांच्या मोबदल्याचा फेरविचार ?

## मुख्यमंत्र्यांचे सकारात्मक आश्वासन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : सूरतचेन्नई ग्रीनफिल्ड महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या अन्यायकारक नुकसान भरपाईचा फेरविचार करून समृद्धी महामार्गाप्रमाणे वाढीव व न्याय्य मोबदला द्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिर्डी येथे भेट घेऊन निवेदनाद्वारे केली. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी सकारात्मक विचार करून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित होते.



तालुक्यातील वडझरी बु., अजमपूर, आरमपूर, चिंचोली गुरव, चिंचपूर खुर्द, हसनाबाद, जुनेगाव, कसारे, लोहारे, सातपूर, तळेगाव, वडझरी खुर्द आदी गावांमधील मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी या महामार्गासाठी संपादित करण्यात आल्या आहेत. सन २०२१-२२ मध्ये भूसंपादनाचा निवाडा जाहीर झाला होता. मात्र, मंजूर करण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याने शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, या भागातील बहुतांश जमिनी निळवंडे कालव्याच्या सिंचनाखालील बागायती व अत्यंत सुपीक स्वरूपाच्या आहेत. ऊस, डाळिंब, फळबागा, भाजीपाला तसेच विविध नगदी पिकांमुळे या जमिनींचे उत्पादनमूल्य व बाजारभाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. स्थानिक व्यवहारांनुसार या जमिनींची किंमत प्रतिएकर सुमारे २५ ते ३० लाख रुपयांपर्यंत असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. मात्र, जाहीर झालेला मोबदला प्रत्यक्ष बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कमी असून काही ठिकाणी तो प्रतिएकर दहा लाख रुपयांपेक्षाही कमी असल्याचे सांगण्यात आले.मिरपूर गावातील एका शेतकऱ्याला केवळ २४ गुंठे जमिनीसाठी सुमारे ५ लाख ९ हजार रुपयांचा मोबदला मंजूर झाल्याचे उदाहरण देत, या रकमेवर इतरत्र पर्यायी जमीन खरेदी करणे अशक्य असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन फेरमूल्यांकन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. राज्यातील समृद्धी महामार्ग, पालखी मार्ग तसेच इतर ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पांमध्ये अनेक भागांतील शेतकऱ्यांना बाजारभावाच्या अनेकपटीने मोबदला देण्यात आला आहे. काही ठिकाणी कोट्यवधी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात आला. मात्र, संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बाबतीत वेगळी भूमिका घेतली जात असल्याची भावना निर्माण झाली असून समान स्वरूपाच्या प्रकल्पांमध्ये अशी तफावत राहणे न्याय व समानतेच्या तत्त्वाला धरून नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

भूसंपादनामुळे अनेक शेतकरी कुटुंबांचा उपजीविकेचा मुख्य आधार संपुष्टात येत आहे. भविष्यात या महामार्ग परिसरात औद्योगिक, व्यावसायिक आणि नागरी विकासाला चालना मिळणार असून शासन व संबंधित यंत्रणांना मोठा आर्थिक लाभ होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनींचे वास्तव मूल्यांकन करून योग्य भरपाई देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच फेअर कम्पेन्सेशन ॲक्ट २०१३ मधील तरतुदीनुसार बाजारभावाच्या चारपटपर्यंत मोबदला देण्याचा विचार शासनाने करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. यावर लवकरच सकारात्मक विचार करून निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## दखल

### पूर्व उच्च माध्य.शिष्यवृत्ती परीक्षेत रामराव आदिक स्कूलचे यश



**श्रीरामपूर** : अशोकनगर येथील रामराव आदिक पब्लिक स्कूलच्या इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील बारा विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले असून, विद्यालय व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या परीक्षेत सुशांत रेवाळे याने २०८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सानिया शेख हिने १९८ गुणांसह द्वितीय, तर रुद्र पोहेकर याने १९२ गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच संस्कार मोरे, साई केदारी, ओमकार जाधव, गायत्री घाडगे, जिशान पठाण, आर्यन दहातोंडे, आदित्य तेलोरे, समर्थ गाडेकर व समर्थ वाटाणे हे विद्यार्थी परीक्षेत पात्र ठरले आहेत. या यशस्वी विद्यार्थ्यांना दिलीप वैराळ, सुहासिनी भोसले, ऋतुजा माळी व पूजा जाधव या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी सातत्याने घेण्यात येणारे विशेष मार्गदर्शन, सराव परीक्षा आणि वैयक्तिक लक्ष यामुळेच विद्यालयाने हे यश संपादन केल्याचे मानले जात आहे.

### कोपरगाव आगारासाठी नवीन ५ बसेस

**कोळपेवाडी** : कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना बस सेवेच्या येणाऱ्या अडचणी विशेषतः विद्यार्थ्यांची प्रवासाची गैरसोय दूर करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी २९ एप्रिल रोजी राज्याचे परिवहन मंत्री ना.प्रतापजी सरनाईक यांची भेट घेऊन कोपरगाव बस आगाराला तातडीने नवीन बस देण्याची मागणी करून त्याबाबत त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू होता. या पाठपुराव्याला यश आले असून कोपरगाव बस आगाराला नवीन ५ जिजाऊ बसेस मंजूर करण्यात आल्या असल्याची माहिती आ.आशुतोष काळे यांनी दिली आहे. कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळणच्या दृष्टीने कोपरगाव बस स्थानक अत्यंत महत्वाचे आहे. शिर्डी- मनमाड- वैजापूर- श्रीरामपूर- संगमनेर- नाशिक या शहरांना जोडणारे कोपरगाव बस स्थानक मध्यवर्ती ठिकाण असून तीर्थक्षेत्र शिर्डी जवळ असल्याने भाविकांना आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना, नागरिकांना जा ये करण्यासाठी बस सुविधा अत्यंत महत्वाची आहे. कोपरगाव बस आगारात बस संख्या कमी असल्याने काही बस फेऱ्या अनियमित झाल्या होत्या त्यामुळे शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, नोकरदार वर्ग आणि प्रवाशांना बस प्रवासात अडचणी येत होत्या. या अडचणी दूर करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी केलेल्या पाठपुराव्यातून कोपरगाव बस आगाराला या नवीन पाच बसेस उपलब्ध झाल्यामुळे काहीशी विस्कळीत झालेली वाहतूक व्यवस्था पुन्हा एकदा रुळावर येण्यास मोठी मदत होणार आहे.त्यामुळे विद्यार्थ्यांची वेळेवर शाळेत पोहोचण्याची चिंता मिटणार असून सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवासही आता अधिक सुखकर आणि आनंददायी होणार आहे.

# संगमनेर खुर्द ते रायतेवाडी फाटा उड्डाणपुलाच्या कामाला वेग : गुंजाळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी तसेच रायतेवाडी फाटा परिसरातील अपघातांना आळा घालण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या संगमनेर खुर्दरायतेवाडी फाटा उड्डाणपुलाच्या कामाला गती मिळाली आहे. हा प्रकल्प आमदार अमोल खताळ यांच्या नियोजनातून साकारत असल्याचा दावा शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख निलेश गुंजाळ यांनी केला.

विकास हवा, पण नागरिकांना त्रास नको, ही भूमिका घेत आमदार खताळ यांनी उड्डाणपुलाच्या डिझाईनपासून लांबी-रुंदीपर्यंत प्रत्येक बाबीचा बारकाईने आढावा घेतला. स्थानिक नागरिक, व्यापारी, शेतकरी आणि वाहनचालकांच्या अडचणी लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी व ठेकेदारांसोबत बैठक घेण्यात आली. यात साईडरोड ग्राउंड लेव्हलवर ठेवणे, स्ट्रिट लाईट, दिशादर्शक फलक, रिफ्लेक्टर तसेच पाण्याच्या निचऱ्याचे नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

रायतेवाडी फाटा येथे अंडरपासची मागणीही मंजूर झाली असून त्या कामालाही वेग आला आहे. आमदार खताळ यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची दोनदा भेट घेऊन पाठपुरावा केला असून कुंभमेळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्याचे गुंजाळ यांनी सांगितले.

# संकल्प पूर्ती ; वासुदेव शिंदे यांनी चप्पल परिधान केली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा मंदिर येथे श्रद्धा, निष्ठा आणि कार्यकर्त्यांच्या भावनिक बांधिलकीचे दर्शन घडले. विवेक कोल्हे यांची विधान परिषदेत आमदार म्हणून नियुक्ती झाल्यानंतर त्यांचे सहकारी वासुदेव शिंदे यांनी तब्बल सहा वर्षांपासून पाळलेला अनवाणी राहण्याचा संकल्प पूर्ण केला.



२०१९ मध्ये माजी आ. स्नेहलता कोल्हे यांचा अल्पशा मतांनी पराभव झाल्यानंतर कोल्हे परिवारातील व्यक्ती आमदार होत नाही तोपर्यंत पायात चप्पल घालणार नाही, असा संकल्प वासुदेव शिंदे यांनी केला होता. हा संकल्प त्यांनी सहा वर्षे जपत अनवाणी राहून पूर्ण केला. आ. विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत त्यांनी पुन्हा पादत्राणे परिधान करत भावनिक क्षण अनुभवला.

विधान परिषद आमदार म्हणून नियुक्तीनंतर गुरुवारी प्रथमच विवेक कोल्हे यांनी पत्नी रेणुकाताई कोल्हे यांच्यासह शिर्डीत येऊन साईबाबांचे दर्शन घेतले. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले. तसेच श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी संस्थानच्या वतीने त्यांचा सत्कार केला.यावेळी बोलताना आ. विवेक कोल्हे म्हणाले, जनतेचा विश्वास, कार्यकर्त्यांचे प्रेम आणि श्री साईबाबांचा आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे. पुढील काळात जनसेवेचे कार्य अधिक जोमाने करण्याचा संकल्प करीत आहे. कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोपरगावातील अतिक्रमण नियमानुकूल प्रक्रियेला गती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : शहरातील लक्ष्मीनगरसह विविध भागांतील अतिक्रमित जागा नियमानुकूल करून संबंधित लाभार्थ्यांच्या नावावर सातबारा देण्याच्या प्रक्रियेला गती मिळत असून यासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती नगराध्यक्ष पराग संधान यांनी दिली.

कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे लक्ष्मीनगरसह शहरातील अतिक्रमित जागा नियमाकुल करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर शिर्डीचे प्रांताधिकारी माणिकराव आहेर यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले.



नगराध्यक्ष संधान म्हणाले की, पूर्वीच्या शासन निर्णयातील कठोर अटींमुळे शहरातील सुमारे सहा हजार प्रॉपर्टीपैकी केवळ दोन हजार प्रकरणे पात्र ठरत होती. मात्र शासनाच्या नवीन धोरणात्मक जीआरमुळे आता सुमारे पाच हजार प्रॉपर्टी नियमानुकूल प्रक्रियेत पात्र ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या विषयासाठी माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी २०१९ मध्ये विशेष पाठपुरावा करून प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नगररचना विभागाकडे पाठविला होता. त्यानंतर आमदार विवेक कोल्हे यांनीही नगराध्यक्ष संधान यांच्यासमवेत बैठक घेऊन विषय तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

महसूल विभागाने जारी केलेल्या नवीन जीआरमध्ये अधिक शिथिलता ठेवून जैसे थे पद्धतीने प्रक्रिया राबवावी, अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. दरम्यान, प्रांताधिकारी आहेर यांनी कायदेशीर व प्रशासकीय बाबी अधिक स्पष्ट करण्यासाठी शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना मागविण्याची आवश्यकता व्यक्त केली. बैठकीस तहसीलदार महेश सावंत, मुख्याधिकारी सुहास जगताप यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती परीक्षेत आत्मा मालिक सेमी राज्यात प्रथम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत कोकमठाण येथील आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरूकुल ने राज्यात सर्वाधिक विद्यार्थी पात्र ठरविण्याचा मान मिळविला आहे. विद्यालयाचे तब्बल ३८४ विद्यार्थी परीक्षेत पात्र ठरले असल्याची माहिती प्राचार्य निरंजन डांगे यांनी दिली. या यशामध्ये १० विद्यार्थ्यांनी २५० पेक्षा अधिक, ७८ विद्यार्थ्यांनी २२० पेक्षा अधिक, तर १४२ विद्यार्थ्यांनी २०० हून अधिक गुण मिळविले. इयत्ता आठवीत तेजस चोंडगीर याने २६४ गुणांसह आघाडी घेतली. मंगेश कदम (२६२), वैभवी जाधव (२६०), करण चरवांडे (२५८), धनंजय दहिफळे (२५४) आणि स्वराली काळे (२५२) यांनी उल्लेखनीय यश मिळविले. इयत्ता पाचवीत सार्थक जोरवर (२५६), भूषण धोणे (२५४), सार्थक शिंदे (२५४) आणि युवराज गर्जे (२५०) यांनी विशेष प्राविण्य मिळविले.विद्यार्थ्यांना शिक्षक व पर्यवेक्षकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी यांनी हे आत्मा मालिक पॅटर्नचे यश असल्याचे सांगत शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# संजीवनी आश्रमशाळेच्या माजी विद्यार्थ्यांची भरारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : माजी मंत्री शंकरराव कोल्हे यांच्या दूरदृष्टीतून २००४ मध्ये स्थापन झालेल्या टाकळी येथील संजीवनी एकलव्य आदिवासी आश्रमशाळा या अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत यश संपादन करत संस्थेचे नाव उंचावले आहे. नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील सचिन साईनाथ पवार याची एअरपोर्ट अथोरिटी ऑफ इंडिया अंतर्गत मुंबई येथे टिकीट चेकर पदावर निवड झाल्याने संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



यशस्वी विद्यार्थी सचिन पवार यांच्या सत्कारप्रसंगी संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे बोलत होते. यावेळी डी. एन. सांगळे, प्राथमिक विभागाचे प्राचार्य आण्णासाहेब टकले आदी उपस्थित होते.

सचिन पवार यांनी २०११ ते २०२१ या कालावधीत संजीवनी आश्रमशाळेत इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण घेतले. शाळेत मिळालेल्या शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासाच्या संस्कारांच्या जोरावर त्यांनी पुढील शिक्षण पूर्ण करत ही यशस्वी भरारी घेतली. ते २६ मेपासून सेवेत रुजू होणार आहेत.

सुमित कोल्हे म्हणाले की, सर्वसामान्य व आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना स्वावलंबी बनविण्याचे स्वप्न स्व. शंकरराव कोल्हे यांनी पाहिले होते. संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली हा वारसा समर्थपणे पुढे जात असून सचिनसारखे विद्यार्थी त्या कार्याचीच प्रेरणादायी उदाहरणे आहेत.

# महाशिवरात्र महोत्सव समितीच्यावतीने कोल्हारमध्ये वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : हिरव्यागार भविष्यासाठी झाडे लावूया हा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कोल्हार येथील महाशिवरात्र महोत्सव समितीच्या वतीने शुक्रवारी (दि. २२ मे) सकाळी कोल्हार पोलीस दूरक्षेत्र व बसस्थानक परिसरात उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर निसर्गाचा समतोल राखण्यासाठी राबविण्यात आलेल्या या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भारतासह महाराष्ट्रात यंदा उष्णतेने विक्रमी पातळी गाठली असताना पर्यावरण संरक्षणाची गरज अधिक अधोरेखित होत आहे. हीच जाणीव ठेवत समितीचे अध्यक्ष अक्षय मोरे आणि त्यांच्या युवा सहकाऱ्यांनी वृक्षारोपण करून समाजासमोर सकारात्मक संदेश दिला.

महाशिवरात्र महोत्सव समिती सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात सातत्याने सक्रिय असून, आगामी पावसाळ्यात कोल्हार व परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आल्याचे अध्यक्ष अक्षय मोरे यांनी सांगितले. यावेळी अक्षय मोरे, श्रीकांत बेंद्रे, श्याम लोखंडे, शाम गोसावी, केतन लोळगे व सुनिल बोरुडे यांनी मनोगत व्यक्त करत पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास अशोक असावा,उदय खर्डे, ज्ञानेश्वर खर्डे, भरत खर्डे, राजेंद्र गलांडे, लता शेलार, विनीत हिरानंदानी, काळुराम बोरुडे, राहुल मोरे, प्रथमेश काळे, कौशल दळवी, अनिकेत बोरुडे, श्रेयश लोखंडे, सोमनाथ फोपसे, स्वप्नील कडसकर, मयूर कडसकर, शिवराज विखे, अनिकेत राजभोज, अजित मिजगुले, चैतन्य दातीर, गोलू मोरे, राहुल काळे, कामेश बोरुडे, गोरख खर्डे, योगेश बोरुडे तसेच पोलीस हेड कॉन्स्टेबल साळवे, कुदनर व अडांगळे आदी उपस्थित होते.

क्र. कावि/जन्म नोंद/५४६/२०२६
संगमनेर, दिनांक ०८/०५/२०२६

**जाहीरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. साबीर शब्बीर शेख रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २४/०३/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वतः नामे शेख शाबीर शेख शब्बीर यांचा जन्म मौजे संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १६/०३/१९७८ रोजी झाला असून त्यांचा/त्यांची जन्म नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसांचे आंत, सुटटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात या कार्यालयात हरकत/तक्रार दाखल करावी. मुदतीनंतर त्या हरकतींचा/तक्रारीचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

# प्रा. योगेश गुंजाळ यांना पुणे विद्यापीठाची पीएच.डी.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेज मधील मॅकॅनिकल विभागातील प्रा. योगेश रामराव गुंजाळ यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी एक्सपिरिमेंटल इन्वेस्टीगेशन इन टू असिस्टंट हीटिंग अंड कूलिंग अप्रोच या विषयात पीएचडी प्रदान केली आहे. डॉ. प्रा. योगेश रामराव गुंजाळ यांनी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर येथील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील संशोधन केंद्रात करण्यात आले असून, या संशोधनासाठी त्यांना डॉ. विजय शिवाजीराव गडाख यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. प्रा. योगेश गुंजाळ हे अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, संगमनेर चे उपाध्यक्ष बाळासाहेब पाटील गुंजाळ यांचे नातू आहेत. त्यांच्या संशोधनामुळे ऑटोमोबाईल उद्योगात वजन कमी करणे, वाहनांची मायलेज वाढवणे तसेच मजबूत व टिकाऊ जोड तयार करणे यासाठी मोठी मदत होणार आहे. या संशोधनाच्या माध्यमातून प्रा. डॉ. श्री. गुंजाळ यांनी २ एससीआय दर्जाचे संशोधन लेख, २ आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधनपत्रे सादर केली आहेत.

# अवकाळीग्रस्त शेतकऱ्यांना ४.३७ कोटीची मदत मंजूर

## १९ गावांतील ५,५९९ शेतकऱ्यांना थेट लाभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर तालुक्यात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे नुकसान झाले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्य शासनाने मोठा दिलासा देत संगमनेर तालुक्यासाठी तब्बल ४ कोटी ३७ लाखांची नुकसानभरपाई मंजूर केली आहे.

संगमनेर तालुक्यातील अनेक गावात मार्च २०२६ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते.



आमदार अमोल खताळ यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे आदेश दिले होते त्यानुसार अधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे पूर्ण करून शासनाला अहवाल सादर केला होता या सर्व नुकसानीची महायुती सरकारने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा दिला राज्यातील बाधित शेतकऱ्यांसाठी तब्बल १६४ कोटी .८३ लाखाची नुकसान भरपाई मंजूर केली आहे. त्यामध्ये अहिल्यानगर जिल्ह्या साठी २५.कोटी २० लाखाची मदत जाहीर करण्यात आली असून यात संगमनेर तालुक्या साठी ४.कोटी३७ लाख रुपयांची नुकसान भरपाई मंजूर केली आहे

संगमनेर तालुक्यातील १९ बाधित गावांतील ५,५९९ शेतकऱ्यांना थेट लाभ होणार असून, २३७१.९२ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीची महायुती सरकारने दखल घेऊन ही मदत दिली जात आहे. संकटाच्या अत्यंत कठीण काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी नेहमीप्रमाणे ठामपणे उभे राहून त्यांना मोठा दिलासा देण्याचे काम शिवसेना महायुती सरकारने केले असून, त्यामुळे आमदार अमोल खताळ यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सुमित्रा पवार कृषिमंत्री दत्तात्रय भरणे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले.

मामला नं.२१/१४२/१४४७ हि

**(दारूल कजा ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड गोविंदपुरा, अहमदनगर)**

शाहीन इकबाल शेख मकाम रामवाडी, सर्जेपुरा, अहमदनगर
.... फरीके अव्वल

बनाम

साहिल बशीर शेख मकाम सहारा कॉर्नर, मुकुंदनगर, अहमदनगर ... फरीके दोम

इत्तेलाह बनाम फरीके दोम

इस मामले मे फरीके अव्वल ने आप फरीके दोम के खेलाफ गाएब व लापता होने और जुमला हुकूके जौजिजयत से महरूमी की बिना पर दारूल कजा ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड गोविंदपुरा, अहमदनगर मे १८/०१/२०२६ को फसखे निकाह का दावा दाएर किया है, लेहाजा इस ऐलान के जरिए आप को आगाह किया जाता है के आप जहाँ कही भी हो फौरन अपनी मौजुदगी की इत्तेलाह दारूल कजा ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ गोविंदपुरा अहमदनगर को दे और अगली तारीखे समाअत १३/०६/२०२६ को आप खुद दारूल कजा में हाजिर हो कर रफए इल्जाम करें, वाजेह रहे के इस तारीख पर हाजिर न होने या कोई पैरवी न करने की सूरत में इस मामले का तसफिया किया जा सकता है।

सिक्का
काजी शरीयत
**QAZI SHARIAT**
दारूल कजा ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड गोविंदपुरा, एकता कॉलोनी, पुलिस स्टेशन के पास अहमदनगर

## पान १ वरुन

### शिर्डीत तयार होणारे 'सूर्यास्त्र' दुश्मनांचा नक्कीच 'सूर्यास्त' करेल!

देशाला निर्यातदार होण्यापासून आता कोणीही रोखू शकणार नाही. निबे उद्योग समूहाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उभे केलेले हे काम देशासाठी अनेक वर्षांचा माईलस्टोन (मैलाचा दगड) ठरेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आजचा दिवस देशाकरिता ऐतिहासिक असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' हे जे संदेश दिले होते, ते संरक्षण क्षेत्राने प्रत्यक्षात अमलात आणले आहेत. त्यामुळे देश आता स्वदेशी पद्धतीने बनविलेल्या उत्पादनांचा निर्यातदार बनला आहे. राज्यात चार डिफेन्स कॉरिडॉर तयार करण्यासाठी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह यांनी मान्यता दिली आहे. यामुळे आता महाराष्ट्र राज्य संरक्षण उत्पादनात प्रथम क्रमांकाचे राज्य बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच नाशिक, पुणे, नागपूर आणि अहिल्यानगर येथे संरक्षण उद्योग समूह विकसित करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले. गणेश निबे यांच्यासारखे युवक या क्षेत्रात करीत असलेले काम भूषणावह आहे. नवीन तंत्रज्ञान आणून देशासाठी काहीतरी निर्माण करण्याची जिद्द त्यांच्यामध्ये आहे. आत्मनिर्भर भारताकरिता नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम 'निबे उद्योग समूह' करीत आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

### लग्नातील आतिषबाजीत फोटोग्राफर भाजला!

असून त्याच्यावर सध्या छत्रपती संभाजीनगर येथे उपचारही करण्यात आले आहेत. मात्र, या दुर्घटनेमुळे मंगलकार्यालयात होणाऱ्या आतिषबाजीच्या सुरक्षेचा मुद्दा प्रामुख्याने समोर आला आहे. लग्नकार्यात फटाके उडवताना, किंवा आतिषबाजी करताना, या सोहळ्यातील उपस्थित नागरिकांच्या जीवाला धोका होईल किंवा दुखापत होईल असे कुठलेही कृत्य होता कामा नये, त्यासाठी काही नियमावली आखून दिली पाहिजे. तसेच, संबंधित दारुगोळा वा फटाक्यांची आतिषबाजी करताना त्या फटाक्यांचा दर्जाही पाहायला हवा, जेणेकरुन अपघात होणार नाही. दरम्यान, फोटोग्राफर्स असोसिएशनच्या टीमने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत यातील दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. या घटनेतून सावरल्यानंतर याबाबत कुटुंबाने तक्रार दिली आहे. त्यामुळेच, आज फोटोग्राफर असोसिएशननेही याबाबत कारवाईची मागणी केली.

### शेतकऱ्यांना वेळेत डिझेल उपलब्ध करून द्या

दिले आहेत. रात्रभर रांगा लावूनही लोकांना पेट्रोल आणि डिझेल मिळताना दिसत नाही. यावरुन हाणामारीच्या घटनाही घडल्या आहेत. या सगळ्यात शेतीची पेरणी व अन्य कामांसाठी डिझेलची गरज असणाऱ्या शेतकऱ्यांची प्रचंड कोंडी झाली आहे. पावसाळा तोंडावर येऊन ठेपला आणि शेतीच्या कामांसाठी डिझेल मिळत नसल्याने बळीराजा प्रचंड हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना शेतकऱ्यांना वेळेत डिझेल उपलब्ध करुन द्या आण त्यांना कोणताही त्रास होणार नाही, अशा उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी शिर्डी येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यातील पेट्रोल आणि डिझेलच्या टंचाईबाबत भाष्य केले. परभणी जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर डिझेल टंचाई निर्माण झाली आहे नागरिक वाहने,कॅन घेवून रांगा लावत आहेत परभणीत दिड पटीने इंधनाची मागणी वाढल्याने ही गर्दी होत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले असून जिल्ह्यात पुरेसा साठा आहे कुणीही साठेबाजी करून नये साठे बाजांवर कारवाई करण्याचे आदेश ही जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण यांनी काढले आहेत. इंधन बंद होणार का?, दर वाढणार का? अशा चर्चांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून,त्यामुळेच पंपांवर मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे जिल्हाधिकारी यांनी म्हटले आहेदरम्यान, कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास शासकीय यंत्रणांना इंधनाचा तुटवडा भासू नये यासाठी जिल्हाधिकारी यांनी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांनी एकूण उपलब्ध साठ्यातून १० टक्के इंधन आपत्कालीन यंत्रणा शासकीय कार्यालये, रुग्णवाहिका, पोलीस,अग्निशमन दल तसेच इतर अत्यावश्यक सेवांसाठी राखीव ठेवावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

संपूर्ण राज्यात आणि देशभरात इंधनाचा मोठा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवत असून याचा परिणाम विविध विभागांवर होत आहे डिझेलचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवत असल्याने याचा परिणाम ट्रान्सपोर्ट व्यवसायावर झाला असून डिझेल वेळेवर मिळत नसून ज्या ठिकाणी डिझेल उपलब्ध आहे त्या ठिकाणी अत्यंत कमी डिझेल उपलब्ध होत असल्याने ट्रान्सपोर्टचा व्यवसाय चालवायचा तरी कसा असा प्रश्न ट्रान्सपोर्ट संघटनेने उपस्थित केला आहे. परराज्य जात असताना त्या ठिकाणी डिझेलचा पुरवठा होत नसल्याने वाहने अडकून पडत असल्याची प्रतिक्रिया ट्रान्सपोर्ट संघटनेने व्यक्त केली आहे, वाहने अनेक दिवस एकाच जागी थांबून राहत असल्याने यामुळे आर्थिक नुकसान देखील मोठ्या प्रमाणावर होत असून वाहनांचे कर्ज घेण्याची तरी कसे असा देखील प्रश्न ट्रान्सपोर्ट संघटनेने उपस्थित केला आहे. शासनाने इंधनाच्या पुरवठ्याबाबत लवकरात लवकर तोडगा काढावा अन्यथा संपावर जाण्याचा इशारा धुळ्यातील ट्रान्सपोर्ट संघटनेने दिला आहे.

### पुणे बनले नीट पेपरफुटीचा केंद्रबिंदू?

तीव्र झाला आहे. या प्रकरणाला अद्याप राजकीय वळण मिळालेलं नसले तरी राजकीय हस्तक्षेपाशिवाय एकाच शहरातील शिक्षकांची निवड होऊ शकते का, याबाबतही चर्चा सुरू झाली आहे. एनटीएचे संचालक पवनकुमार शर्मा आणि महासंचालक अभिषेक सिंग यांनी या प्रश्नांवर थेट भाष्य टाळण्याचा प्रयत्न केला असला तरी, एनटीएवरील गमावलेला विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी सीबीआयने या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## आ. आशुतोष काळे यांच्या इशाऱ्यानंतर परिवहन विभाग ॲक्शन मोडमध्ये

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव मतदारसंघातील ग्रामीण रस्त्यांवर सुरू असलेल्या ओव्हरलोड अवजड वाहनांच्या वाहतुकीविरोधात आमदार आशुतोष काळे यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर परिवहन विभागाने तत्काळ कारवाईची भूमिका घेतली आहे. गुरुवारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतर अवघ्या काही तासांतच ग्रामीण रस्त्यांवरील ओव्हरलोड वाहनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश जारी करण्यात आले. ग्रामीण भागातील अंतर्गत दळणवळण सुलभ व्हावे यासाठी पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून रस्ते उभारण्यात आले आहेत. मात्र क्षमतेपेक्षा अधिक भार वाहून नेणाऱ्या अवजड वाहनांमुळे हे रस्ते मोठ्या प्रमाणावर खराब होत असल्याची बाब आमदार काळे यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिली. रस्त्यांची ठराविक वजन क्षमता असताना दिवस-रात्र ओव्हरलोड वाहतूक सुरू असताना परिवहन विभाग दुर्लक्ष का करीत आहे? असा सवाल त्यांनी अधिकाऱ्यांना केला. या अनधिकृत वाहतुकीमुळे रस्ते खचत असून रस्त्यालगत राहणाऱ्या नागरिकांच्या तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होत असल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. यापुढेही कारवाई न झाल्यास वेगळा पवित्रा घ्यावा लागेल, असा इशाराही आमदार काळे यांनी दिला होता. दरम्यान, परिवहन विभागाने या सूचनांची गांभीर्याने दखल घेत ग्रामीण भागातील ओव्हरलोड वाहनांवर विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अनधिकृत वाहतुकीला आळा बसणार असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



## बाळासाहेब थोरात यांच्या जाणत्या नेतृत्वाची राज्याला गरज : हर्षवर्धन सपकाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** जनतेची सातत्याने कामे करणारे, पक्षनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि स्वच्छ आचार-विचार जपणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यासारख्या जाणत्या नेतृत्वाची राज्याला गरज आहे, असे प्रतिपादन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना व अमृत उद्योग समूहाला सदिच्छा भेट दिल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बाळासाहेब थोरात, व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले, जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, बाळासाहेब थोरात हे काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ नेतृत्व असून त्यांनी विविध जबाबदाऱ्या अत्यंत कार्यक्षमतेने पार पाडल्या आहेत. एका निवडणुकीवर नेतृत्वाचे मूल्यमापन होत नाही. इतिहासात अनेक थोर नेत्यांच्या आयुष्यात चढ-उतार आले, मात्र त्यानंतरचा टप्पा अधिक मोठा ठरला आहे. संगमनेरकरांच्या मनामध्ये जे आहे, तेच माझ्याही मनात आहे.



देशातील सध्याच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीवर टीका करताना त्यांनी भाजप प्रणीत सरकारवर निशाणा साधला. देशात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार वाढला असून पेट्रोल-डिझेल दरवाढ, बेरोजगारी आणि शेतमालाला भाव नसल्याने जनतेमध्ये असंतोष आहे. सोशल मीडियामुळे संवादाची पद्धत बदलली असून समाजात कटुता वाढत आहे, असे ते म्हणाले.

काँग्रेस कार्यकर्त्यांनी संघटन मजबूत करण्यासाठी बूथ स्तरावर काम करावे तसेच मतदार पुनरनिरीक्षण मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी बाळासाहेब थोरात यांनीही केंद्र व राज्य सरकारच्या धोरणांवर टीका केली. देशात डिझेल-पेट्रोलचा तुटवडा निर्माण झाला आहे. शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. खरीप हंगाम तोंडावर असताना सरकारने शेतकऱ्यांची काळजी घेणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. तसेच प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ स्तरावर मतदार नोंदणी प्रक्रियेत लक्ष घालण्याचे आवाहन त्यांनी केले.

सपकाळ यांनी संगमनेरला सहकाराचे तीर्थक्षेत्र संबोधत सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या विचारातून संगमनेरचा सहकार उभा राहिल्याचे सांगितले. सर्वसामान्यांच्या विकासाचा काँग्रेसचा विचार असून बाळासाहेब थोरात यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे आहे, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे स्वागत सचिन गुजर यांनी केले, तर अजय फटांगरे व सोमेश्वर दिवटे यांनी आभार मानले. महिला व युवक कार्यकर्त्यांची यावेळी मोठी उपस्थिती होती.

## गंगापुर आगाराच्या सर्व गाड्याच्या पुर्वीप्रमाणे फेऱ्या चालू करण्याची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

गंगापूर : गाजगाव मार्गे चालणाऱ्या गंगापुर आगाराच्या सर्व गाड्याच्या पुर्वीप्रमाणे फेऱ्या चालू करण्याची मागणी गुलाब शाह यांनी विभागीय नियंत्रक नेहुल यांच्याकडे निवेदनात केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गंगापुर आगाराच्या बस गाड्याच्या फेऱ्या छत्रपती संभाजीनगर ते गाजगाव मार्गे लासुरस्टेशन व लासुरस्टेशन ते गाजगाव मार्गे छत्रपती संभाजीनगर या मार्गावर सुरू असलेल्या बसगाड्या काही दिवसांपासून गंगापुर आगारातून फेऱ्या कमी करण्यात आल्या तसेच एक गाडी बंद करण्यात आली. ती गाडी चालू करण्यात यावी गाजगाव मार्गे गवळी शिवरा मुक्कामी गाडीची पुर्वीप्रमाणे फेऱ्या चालू करण्यात कराव्यात या मार्गावर अवैध्य वाहतूक आम्ही बंद केलेली आहे. या परिसरातून छत्रपती संभाजीनगर येथे अनेक प्रवासी हॉस्पीटला औद्योगिक वसाहतीत रोजगारासाठी जातात त्याच प्रमाणे महाविद्यालयीन व इतर शिक्षण घेण्यासाठी



विद्यार्थी दररोज जाणेयेणे करतात गंगापूर आगाराने बस गाड्या तसेच फेऱ्या बंद केल्याने प्रवाशांना मोठा अडचणीचा सामना करावा लागत आहे.गाजगाव मार्गे चालणाऱ्या गंगापुर आगाराच्या सर्व गाड्याच्या पुर्वीप्रमाणे फेऱ्या चालू करण्याची मागणी गुलाब शाह यांनी निवेदनाद्वरे करण्यात आली आहे.

## डॉ. बेल्हेकर यांना राज्यस्तरीय 'शब्दगंध शैक्षणिक कार्य गौरव पुरस्कार'

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने दिला जाणारा यंदाचा मानाचा ''राज्यस्तरीय शब्दगंध शैक्षणिक कार्य गौरव पुरस्कार २०२६'' नेवासा तालुक्यातील भानसहिवरे येथील सुलोचना बेल्हेकर शिक्षण संस्थेच्या संचलिका डॉ.सौ. रंजनाताई सुरेश बेल्हेकर यांना जाहीर झाला आहे. त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन दि. २३ आणि २४ मे २०२६ रोजी जाधव लॉन्स, नगर-कल्याण रोड, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या दोन दिवशीय संमेलनाचा समारोप रविवारी होणार आहे. रविवार, दि. २४ मे २०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता संमेलनाच्या समारोप समारंभामध्ये डॉ. रंजनाताई बेल्हेकर यांना हा गौरव पुरस्कार पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, कृषीमंत्री ना.दत्तात्रय भरणे, आमदार संग्राम भैय्या जगताप यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याला मित्र परिवारासह तालुक्यातील नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शब्दगंध साहित्यिक परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे,कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, सचिव सुनील गोसावी,नेवासा तालुका शाखा अध्यक्ष प्रा. डॉ. किशोर धनवटे,मार्गदर्शक प्रा.डॉ. अशोकराव ढगे यांनी केले आहे. डॉ. रंजनाताईं बेल्हेकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## निधन वार्ता

### सुधाकर वाकचौर



**लोणी**: येथील सुधाकर वामनराव वाकचौर (वय ७४) यांचे गुरुवार दि.२१मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. श्रीरामपूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश सिद्धार्थ साळवे यांचे ते मेहुणे होत .

### प्रतिक गोरे



**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील कमालपूर येथील प्रतिक अनिल गोरे (वय २२) या पुणे येथे शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे सुट्टीत गावी आलेला असताना अपघातात निधन झाले.त्यांच्या पश्चात आई वडील, बहिण, चुलती, चुलत बहिण भाऊ असा परिवार असून माजी सरपंच अनिल गोरे यांचा तो एकुलता एक मुलगा होत.

### भाऊसाहेब निबे



**प्रवरानगर** : राहता तालुक्यातील कोल्हार बुद्रुक येथील जुन्या पिढीतील प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब कोंडाजी निबे (वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे पश्चात भाऊ, भावजया, मुलगा, चार मुली, जावई, पुतणे, पुतण्या, सुना, नातवंडे, असा परिवार असून ते रघुनाथ कोंडाजी निबे यांचे बंधू तर तुषार निबे यांचे वडील होत.

## पायरेन्सच्या डॉ. विखे पाटील आयुर्वेद महाविद्यालयात तंबाखूमुक्ती केंद्राची सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : ग्रामीण भागातील युवक आणि नागरिकांना तंबाखूच्या व्यसनातून मुक्त करण्यासाठी पायरेन्स संस्थेने महत्त्वपूर्ण पुढाकार घेत पायरेन्स संस्था अंतर्गत डॉ. विखे पाटील मेमोरियल आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे अत्याधुनिक तंबाखूमुक्ती केंद्र सुरू केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात आला असून व्यसनमुक्त आणि निरोगी समाज घडविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

देशभरात तंबाखू सेवनामुळे कर्करोग, हृदयरोग आणि फुफ्फुसांच्या आजारांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे केंद्र प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाययोजनांवर भर देणार आहे. येथे तज्ज्ञ डॉक्टरांकडून समुपदेशन, मानसिक आधार, आवश्यक वैद्यकीय उपचार तसेच व्यसनमुक्तीसाठी विशेष मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या केंद्रासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची स्वतंत्र टीम कार्यरत राहणार असून डॉ. महेश राजूर, डॉ. चित्रा के. यांच्यासह आठ तज्ज्ञ या मोहिमेत सहभागी होणार आहेत. रुग्णांना वैयक्तिक समुपदेशनासोबतच आवश्यक उपचार देण्यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पायरेन्स संस्था विविध सामाजिक उपक्रम



राबवत आहे. यापूर्वी संस्थेने प्लास्टिकमुक्त परिसर अभियान यशस्वीपणे राबविले होते. आता तंबाखूमुक्त समाज निर्मितीचा निर्धार करत हा नवा सामाजिक उपक्रम हाती घेण्यात आला आहे.संस्थेचे संचालक व सचिव डॉ. निलेश बनकर यांनी सांगितले की, शिक्षण, आरोग्य, कृषी आणि सामाजिक परिवर्तन या क्षेत्रांत सातत्याने कार्य करणाऱ्या पायरेन्स संस्थेचा हा उपक्रम युवकांना व्यसनांपासून दूर ठेवून निरोगी व जागरूक समाज घडविण्यास मदत करणार आहे.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कल्पना साठे म्हणाल्या, तंबाखूमुक्त समाज घडविण्यासाठी वैद्यकीय उपचारांइतकेच मानसिक आधार आणि सातत्यपूर्ण समुपदेशन महत्त्वाचे आहे. या केंद्रामुळे अनेकांना नवजीवन मिळण्यास मदत होईल.ग्रामीण भागातील आरोग्य क्षेत्रात पायरेन्स संस्थेने उचललेले हे पाऊल समाजहिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जात असून युवकांना व्यसनमुक्त जीवनाकडे नेणारा हा उपक्रम भविष्यात मैलाचा दगड ठरणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

CHANGE IN NAME

I HAVE CHANGED MY MOTHER'S OLD NAME FROM HEMA PRAMOD NALKANDE TO NEW NAME HEMLATA PRAMOD NALKANDE, RESIDING AT NEWASA. HENCEFORTH, SHE SHALL BE KNOWN AS HEMLATA PRAMOD NALKANDE FOR ALL PURPOSES.

## तेलकुडगाव-देडगाव रस्त्यावरील अतिक्रमण हटवा

### मुंगसे वस्ती परिसरातील अडथळ्यांमुळे अपघातांचा धोका; ग्रामपंचायतीला निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तेलकुडगाव-देडगाव रस्त्यावरील मुंगसे वस्ती परिसरात रस्त्यावर आणि रस्त्याच्या कडेला ट्रॅक्टर, शेतीची अवजारे तसेच सरपणाचे ढीग टाकण्यात येत असल्यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार तेलकुडगाव ग्रामस्थांनी केली आहे. या समस्येमुळे वारंवार अपघात घडत असून नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रामपंचायतीला निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, संबंधित रस्त्यावर अनेकदा ट्रॅक्टर व अवजड शेती अवजारे रस्त्यालगत उभी केली जातात. तसेच काही ठिकाणी सरपणाचे ढीग रस्त्यावरच मांडण्यात येतात. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्यावरून वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका अधिक वाढत असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

याच अडथळ्यांमुळे एका बस चालकाला बसची काच फुटल्याने हजार रुपयांचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कारवाई करून रस्त्यावरील अतिक्रमण आणि अडथळे हटवावेत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या निवेदनावर संजय काळे, विकाजी काळे, अप्पासाहेब घाडगे, भाऊसाहेब डोंगरे, प्रमोद गिरी, अभय माने, बालाजी गुंजाळे, महावीर गायके, किरण परशण, अर्जुन कर्डिले, सदाशिव काळे, मधुराम घाडगे, आनंदराव गायकवाड, प्रशांत काळे, सिताराम काळे, किशोर नवडे, आकाश दुगाडे, अरुण काळे, गणेश काळे, नृसिंग काळे, युवराज काळे, दत्तात्रय काळे, गौरव काळे आणि बाळासाहेब काळे आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## पुणतांबा बंधाऱ्यावरील रस्ता बनला मृत्यूचा सापळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : गोदावरी नदीवरील पुणतांबा येथील कोल्हापूर पद्धतीच्या वसंत बंधाऱ्यावरील संरक्षक कठड्यांची दुरवस्था झाल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक ठिकाणी कठडे तुटले असून दोन्ही बाजूंना बसविण्यात आलेले लोखंडी पाइप वाकलेले किंवा पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. पुणतांबा परिसरातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी माजी पाटबंधारे मंत्री अण्णासाहेब म्हस्के यांच्या प्रयत्नातून १९९० च्या सुमारास हा कोल्हापूर पद्धतीचा बंधारा उभारण्यात आला होता. या बंधाऱ्यावरील पुलाचा वापर नदीकाठच्या गावांसह पुणतांबा परिसरातील नागरिक दळणवळणासाठी मोठ्या प्रमाणात करतात. अंदाजे पाव टीएमसीपेक्षा अधिक पाणीसाठा क्षमता असलेल्या या बंधाऱ्यामुळे परिसरातील सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला आहे. मात्र, मागील वर्षी गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे बंधाऱ्यावरील अनेक संरक्षक कठडे तुटले. तसेच लोखंडी पाइपही खराब झाले. काही पाइप पुराच्या पाण्यात वाहून गेले आहेत. त्यामुळे बंधाऱ्यावरून वाहने व पादचारी यांची ये-जा धोकादायक बनली आहे.सुमारे तीन वर्षांपूर्वी बंधाऱ्यावरील रस्त्याची दुरुस्ती करून नवीन कठडे व लोखंडी पाइप बसविण्यात आले होते. यासाठी अंदाजे २५ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. गोदावरीला आलेल्या पुरातच या कामाची मोठ्या प्रमाणात हानी झाली होती. त्यानंतर वारंवार मागणी करूनही दुरुस्ती करण्यात आलेली नाही. दरम्यान, विद्यमान आमदार आशुतोष काळे यांच्या प्रयत्नातून नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वसाधारण वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत रेल्वे गेट ते गोदावरी बंधारा रस्त्यापर्यंत सुमारे ४० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी मिळाली होती. सध्या या रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, या कामासोबतच बंधाऱ्यावरील रस्ता व संरक्षक कठड्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

रविवार दि .२४ मे २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२५<br>१७०<br>११६ | ८-५ | १४०<br>१०९<br>११९ | जोड<br>८०-१५-३४-८९-५६ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १३०<br>५९०<br>६८० | ४-७ | १२४<br>१७९<br>११५ | जोड<br>४१-०७-३९<br>७३-७५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२०<br>६९०<br>५८० | ३-९ | २१०<br>२८९<br>२२५ | जोड<br>३१-०९-६४<br>७९-९८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

## दखल

### पीएसआय आदिनाथ कोठाळे यांची सहाय्यक पोलिस निरीक्षक पदी बढती



एरंडगाव : शेवगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ कोठाळे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी बढती झाल्याने सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे. आदिनाथ कोठाळे यांचे मूळ गाव तिडी, तालुका वैजापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील आहेत.

गेल्या ११ वर्षांपासून त्यांनी पोलीस दलात उल्लेखनीय सेवा बजावली असून जालना, गडचिरोली, नाशिक आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये त्यांनी कर्तव्य पार पाडले आहे. विशेषतः गडचिरोली येथील नक्षलग्रस्त भागात त्यांनी तब्बल साडेतीन वर्षे धाडसी व उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यांच्या उत्कृष्ट सेवेमुळे त्यांना खडतर सेवा पदक तसेच अंतरिक सेवा पदकाने गौरविण्यात आलेले आहे. कर्तव्यदक्ष, शिस्तप्रिय आणि जनसामान्यांशी सलोख्याचे संबंध ठेवणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या बढतीमुळे तिडी गावासह वैजापूर तालुक्यांसह इतर गावातही आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

### ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर संस्थेच्या अध्यक्षपदी बारस्कर बिनविरोध



अहिल्यानगर : ग्रामीण विकास मंडळ एमआयडीसी नागपूर माध्यमिक व उच्च माध्यमिक संस्थेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तसेच मुख्य विश्वस्त प्रवर्तकपदी इंजिनिअर बबनराव कातोरे तर सचिवपदी डॉ. भूषण अनभुले यांची निवड करण्यात आली असून धर्मदाय उपायुक्त कार्यालय, अहिल्यानगर यांनी या निवडीस अधिकृत मंजुरी दिली आहे.स्थेच्या मागील कार्यकारी मंडळाचा कार्यकाल संपल्यानंतर दिनांक ९ मे रोजी संस्थेच्या आजीव सभासदांची सभा पार पडली. या सभेमध्ये संस्थेच्या घटनेतील कार्यकारी मंडळ निवडीच्या तरतुदीनुसार नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. त्यानंतर सदर बदल अर्ज धर्मदाय उपायुक्त कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता. त्या अर्जास अखेर मंजुरी मिळाल्याची माहिती नूतन अध्यक्ष संपत बारस्कर यांनी दिली.

या नव्या कार्यकारी मंडळामध्ये उपाध्यक्षपदी रावसाहेब सप्रे, खजिनदारपदी सुदाम भोर, विश्वस्त प्रवर्तक म्हणून प्रकाश गुगळे, शरद भोर, शांताराम गाडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच कार्यकारी सदस्य म्हणून दिगंबर सप्रे, ॲड. विक्रम वाडेकर, प्रवीण कातोरे, क्रांतीकला अनभुले, भालचंद्र शिरोडे, भगवान हावरे आणि निर्मला मुळे यांची निवड करण्यात आली आहे.

### आचारसंहिता संपली,जिल्हा परिषदेत रखडलेल्या बदल्या होणार

अहिल्यानगर : विधानपरिषद आचारसंहितेमुळे स्थगित करण्यात आलेली कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन आणि ग्रामीण पाणीपुरवठा या चार विभागांची बदली प्रक्रिया सोमवार, दि. २५ मे २०२६ रोजी होणार आहे. प्रशासनाने याबाबतचे वेळापत्रक जाहीर केले आहे.यापूर्वी निर्गमित वेळापत्रकानुसारच ही प्रक्रिया पार पडणार आहे. २५ मे रोजी सकाळी ९.४५ वाजल्यापासून विभागनिहाय बदली प्रक्रिया सुरू होईल.

# वादळीवाऱ्याच्या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज** : जवळा परिसरात शुक्रवार दि.२२ रोजी दुपारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या नुकसानी झाल्या असून नुकसानीचा सरसकट पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी जनतेतून होत आहे. यामध्ये केळी,पपई, डाळींब तसेच आंब्याच्या बागा भुईसपाट झाल्या असून शेतकऱ्यांच्या लाखो रूपयांच्या नुकसानी झाल्या असून तातडीने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्याची मागणी जनतेतून होत आहे. गेली दोन ते तीन दिवसांपासून पाऊसाचे वातावरण होते. मात्र पाऊस येईल व जाईल असाच अंदाज होता. मात्र दुपारी वादळ वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. होत्याचे नव्हते झाले आणी बघता बघता फळबागा उध्वस्त झाल्या. जवळा परिसर हा कुकडी डावा कालवा अंतर्गत येत असून बागायत



क्षेत्र म्हणून हा परिसर आर्थिक समृद्धी मिळवून देणारा आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणात फळबागा असून यामध्ये केळी,डाळींब,पपई, आंबा या फळबागा मोठ्या प्रमाणात आहेत. शेकडो हेक्टर फळबागा या वादळीवाऱ्यासह झालेल्या पावसाने कोट्यवधी रुपयांची नुकसान झाली आहे. ठिकठिकाणी कैऱ्यांचे ढिगच ढीग पाहावयास मिळाले परिपक्व न झालेल्या कैऱ्या पडल्याने शेतकरी व सर्वसामान्य जनता आंबराईला मुकणार आहे.

या सर्व बागा जमीनदोस्त झाल्या आहेत. तसेच जवळा व परिसरात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे एस टी बस स्थानक परिसरातील घरांचे पत्रे उडून गेले तसेच सुरु असलेल्या बांधकामाचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांचे सोलर पंपावरील साहित्य उडून गेल्याने सोलरचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. संबंधित तहसीलदार व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या नुकसानग्रस्त झालेल्या भागांची तातडीने पाहाणी करुन नुकसानभरपाई देण्याची मागणी जनतेतून होत आहे.

## बोगस बियाणे विक्रेत्यांचे लायसन्स रद्द करणार : कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देत शहर विकासकामांचा आढावा घेतला. सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती त्यांनी यावेळी जाणून घेतली. यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले, नगरसेवक प्रकाश भागानगरे आदी उपस्थित होते.

पत्रकारांशी संवाद साधताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यामध्ये बोगस बी-बियाणे विकणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून संबंधित दुकानदारांचे लायसन्स रद्द करण्यात येतील. शेतकऱ्यांची फसवणूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

कांद्याच्या दरातील घसरणीबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, कांद्याचे दर कमी झाल्याची वस्तुस्थिती आहे. याबाबत पणनमंत्री जयकुमार रावल विविध उपाययोजना करत असून राज्य सरकारने कांदा खरेदी सुरू केली आहे.

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून पूर्वीपेक्षा २० ते ३० टक्क्यांनी इंधन खरेदी वाढल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली असून ३० जूनपर्यंत याबाबतचा अंतिम निर्णय होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. कर्जमाफीसंदर्भातील अहवाल राज्य सरकारकडे सादर झाला असून लवकरच दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी केली जाईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले.

## करमाळा-जामखेड राज्यमार्गासाठी ३०० कोटींचा निधी

### प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : कर्जत-जामखेड मतदारसंघातील दळणवळणाला नवी दिशा देणारा अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून दुरवस्थेमुळे चर्चेत राहिलेल्या करमाळा-जामखेड राज्यमार्ग क्र. ५६ च्या सुधारणा आणि रुंदीकरणाच्या कामाला अखेर गती मिळाली असून, पहिल्या टप्प्यात तब्बल ४० किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यासाठी अंदाजे ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. 'महाराष्ट्र अमृत काल रस्ते विकास योजना (टप्पा १)' अंतर्गत या प्रकल्पाचा समावेश करण्यात आला आहे. आशियाई विकास बँकेच्या एडीबी अर्थसाहाय्य योजनेतून या रस्त्याला प्राधान्य देऊन काम हाती घेतले जात आहे. करमाळा ते जामखेड दरम्यानचा हा ४० कि.मी.चा जुना मार्ग आता १० मीटर रुंदीच्या उच्च दर्जाच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यामध्ये रूपांतरित केला जाणार आहे. भविष्यात हा मार्ग करमाळा, जामखेडसह सोलापूर, अहिल्यानगर आणि बीड या जिल्ह्यांना अधिक सक्षमपणे जोडणारा मुख्य विकासमार्ग ठरणार आहे.



**कर्जत-जामखेड मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी दळणवळण सक्षम करणे हे आमचे ध्येय आहे. हा रस्ता जनतेच्या रोजच्या जिव्हाळ्याचा विषय होता. या ऐतिहासिक निर्णयामुळे नागरिकांचा प्रवास सुरक्षित, जलद आणि दर्जेदार होईल. मतदारसंघाला न्याय दिल्याबद्दल महायुती सरकारचे मनःपूर्वक आभार.**

**- प्रा. राम शिंदे (सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद)**

## उपसभापती पदाच्या वादातून कर्जत बाजार समितीत तणाव ; अभय पाटील यांच्या दालनाला टाळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदावरून सुरू असलेल्या वादाने शनिवारी तीव्र स्वरूप धारण केले. दोन वर्षांनंतर उपसभापती पद देण्याचा शब्द पाळला नसल्याचा आरोप करत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संचालक बळीराम यादव आणि त्यांच्या समर्थकांनी विद्यमान उपसभापती अभय पाटील यांच्या दालनाला टाळे ठोकत नामफलक काढून आंदोलन केले. या प्रकारामुळे बाजार समिती परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

मागील सहा महिन्यांपासून बाजार समितीतील संचालकांमध्ये अंतर्गत धुसफूस सुरू असल्याचे सांगितले जात आहे. पदाधिकारी निवडीवेळी बळीराम यादव यांना दोन वर्षांनंतर उपसभापती पदाची संधी दिली जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात राम शिंदे गटाकडून अभय पाटील यांना उपसभापतीपद देण्यात आले होते.

मात्र दोन वर्षांचा कालावधी उलटल्यानंतरही अभय पाटील यांनी पदाचा राजीनामा दिला नसल्याने शिवसेना उबाठा गट आक्रमक झाला आहे.

शनिवारी सकाळी यादव समर्थकांनी बाजार समिती कार्यालयात जोरदार घोषणाबाजी करत अभय पाटील यांच्या दालनास टाळे ठोकले. तसेच त्यांच्या नावाचा फलकही हटविण्यात आला. यामुळे काही काळ बाजार समितीच्या कामकाजावर परिणाम झाला.

दरम्यान, यापूर्वीही मासिक बैठकीत याच मुद्द्यावरून वाद झाल्याचे समोर आले आहे. या महिन्याअखेरपर्यंत दिलेला शब्द पाळला गेला नाही तर संपूर्ण बाजार समितीचा कारभार बंद पाडण्याचा इशारा शिवसेना उबाठा गटाने दिला आहे.

## माध्यमिक शिक्षक संघाची शिक्षण आयुक्तांसोबत बैठक; शिक्षकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : शिक्षण क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची पुणे येथे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आमदार सत्यजित तांबे, शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर तसेच शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी उपस्थित होते. नाशिक विभागातील सर्व शिक्षणाधिकारी या बैठकीला ऑनलाईन सहभागी झाले होते.

बैठकीत महाराष्ट्र शिक्षक संघटनेच्या वतीने एस. डी. भिरुड, राज्य फेडरेशन संघाचे कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे, शिक्षक नेते आप्पासाहेब शिंदे, दिलीप काटे तसेच अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सचिव अमोल ठाणगे आणि दिपक दरेकर यांनी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित विषयांवर सविस्तर चर्चा केली.



बैठकीदरम्यान शिक्षकांचे रखडलेले वेतन, संच मान्यता, दप्तर दिरंगाई, शालार्थ मान्यता, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व मुख्याध्यापक मान्यता, डी.एड.-बी.एड. प्रमोशन मान्यता, अकरावी प्रवेश प्रक्रिया, समायोजन तसेच शालार्थ आयडी संदर्भातील प्रश्न उपस्थित करण्यात आले. विविध प्रशासकीय कामांमध्ये होणारी अडवणूक आणि त्यामुळे शिक्षकांना भेडसावणाऱ्या अडचणींचाही मुद्दा संघटनेने ठळकपणे मांडला.

याशिवाय अंशतः अनुदानित शिक्षकांचे नियमित वेतन, शिक्षक भरती प्रक्रियेतील अडचणी, रोस्टर तपासणी, टीईटी अट, डीसीपीएस प्रकरणे, टप्पा अनुदान, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील अनेक प्रलंबित विषयांवरही सकारात्मक चर्चा करण्यात आली. ग्रामीण व आदिवासी भागातील शिक्षकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडेही संघटनेने शिक्षण विभागाचे लक्ष वेधले.

अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील अडचणी, पवित्र पोर्टलमधील तांत्रिक त्रुटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात अडचणीत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले. संघटनेच्या वतीने शिक्षण विभागास विविध मागण्यांचे निवेदन सादर करून प्रलंबित विषयांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी संघटनेच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरच योग्य निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. मात्र, २५ मेपर्यंत शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न मार्गी न लागल्यास शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आमदार सत्यजित तांबे यांनी दिला. त्यामुळे शिक्षण विभाग आणि शिक्षक संघटनांमधील चर्चेकडे राज्यातील शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

## केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या बास्केटबॉल लीगला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने आयोजित १४ वर्षांखालील मुला-मुलींची बास्केटबॉल लीग स्पर्धा ऊर्जा गुरुकुल स्कूल, केडगाव येथे उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील उदयोन्मुख खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू, पालक आणि क्रीडाप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

अकॅडमीचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशिक्षक छबुराव कोतकर व स्वाती बाराहाते यांच्या नियोजनातून स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. स्पर्धेदरम्यान खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, चपळ हालचाली आणि क्रीडाभावनेचे दर्शन घडवत उपस्थितांची मने जिंकली. स्पर्धेसाठी सचिन अग्रवाल, ओम



सिंग बायस, मार्शल, हर्षल शेलोत, ऊर्जा गुरुकुलच्या संचालिका कल्याणी फिरोदिया, ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेसचे प्रसाद जमदाडे, प्रसाद आंधळे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विजेत्या संघांना पारितोषिके व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आली. यावेळी प्रशिक्षक छबुराव कोतकर म्हणाले, मुला-मुलींमध्ये बास्केटबॉलसारख्या खेळाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे, हा स्पर्धेमागील मुख्य उद्देश आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी सहकारी, प्रशिक्षक व स्वयंसेवकांचे अकॅडमीतर्फे आभार मानण्यात आले.

## ड्रोनच्या साहाय्याने प्रभागाचा नकाशा तयार

### जनगणना कार्यात डॉ. बागुल यांचा अभिनव उपक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : गृह मंत्रालय, भारत सरकारच्या डिजिटल जनगणना उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेची पूर्वतयारी वेगाने सुरू असून, या प्रक्रियेत प्रगणक शिक्षक डॉ. अमोल बागुल यांनी तंत्रज्ञानाधिष्ठित अभिनव उपक्रम राबविला आहे. आपल्या कार्यक्षेत्रातील घरयादी प्रभागाचा अचूक आणि अद्ययावत नकाशा तयार करण्यासाठी त्यांनी आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.



ड्रोनच्या सहाय्याने संपूर्ण परिसराचे हवाई छायाचित्रण करण्यात आले. त्याआधारे प्रभागातील रस्ते, घरे, गल्ली, प्रमुख स्थळे आणि भौगोलिक रचना यांचे बारकाईने निरीक्षण करून जनगणना कार्यासाठी उपयुक्त असा सुस्पष्ट व अद्ययावत नकाशा तयार करण्यात आला. या उपक्रमामुळे घरांची अचूक ओळख पटविणे, क्षेत्रनिहाय नियोजन करणे तसेच घरभेटी अधिक सुलभ पद्धतीने घेणे शक्य होणार आहे.

यावेळी यशवंत डांगे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जनगणना प्रक्रिया अधिक अचूक व परिणामकारक करण्याचा हा प्रयत्न प्रशंसनीय आहे. यामुळे जनगणना कार्यातील अचूकता वाढण्यास मदत होणार असून हा उपक्रम इतर प्रगणकांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

या प्रसंगी सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, प्रभाग अधिकारी बाळासाहेब पवार, मास्टर ट्रेनर डॉ. संतोष देशमुख, रफिक देशमुख, पर्यवेक्षक अलका दहातोंडे तसेच विविध प्रगणक उपस्थित होते.

डॉ. अमोल बागुल यांनी सांगितले की, जनगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय प्रक्रिया आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केल्यास हे कार्य अधिक सुलभ, अचूक आणि पारदर्शक होऊ शकते. त्याच उद्देशाने ड्रोनच्या सहाय्याने नकाशा तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रातील या नाविन्यपूर्ण उपक्रमाची नागरिकांसह प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातही चर्चा होत असून, डिजिटल भारताच्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

## पिंपळगाव उज्जैनी तलाव खोलीकरणाला वेग; आ. कर्डिले यांनी केली पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैनी येथील ससेवाडी रोडवरील गाव तलावाच्या खोलीकरण व गाळ उपसा कामाला वेग आला असून या कामाची पाहणी आमदार अक्षय कर्डिले यांनी केली. लघुपाटबंधारे विभाग व जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या या कामातून सुमारे पाच हजार ब्रास गाळ अल्पभूधारक शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला जाणार आहे.

गाळमुक्त धरण - गाळयुक्त शिवार योजनेअंतर्गत माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रयत्नातून या कामासाठी १७.५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. अनेक दिवसांपासून रखडलेल्या या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना सूचना देताना आमदार कर्डिले म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील जलयुक्त शिवार योजनेमुळे राज्यातील अनेक दुष्काळग्रस्त भागांना मोठा दिलासा मिळाला आहे. तलाव, नद्या, धरणे आणि बंधाऱ्यांचे खोलीकरण व गाळ उपशामुळे अतिरिक्त पाणीसाठा निर्माण झाला असून अनेक गावे दुष्काळमुक्त होण्यास मदत झाली आहे.

द • ख • ल

## पेठ परिसरात वादळी पावसाचा धुमाकूळ पवनचक्की कोसळून झाडावर पडली

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यात शुक्रवारी दि. २२ झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तालुक्यातील सातगाव पठार येथील पेठ परिसरात वादळी वाऱ्याचा जोर इतका होता की, पेठ ग्रामपंचायत हद्दीतील एक पवनचक्की थेट कोसळून भुईसपाट झाली. कोसळलेली पवनचक्की जवळील मंदिराच्या संरक्षण भिंतीच्या आतल्या बाजूने असलेल्या झाडावर पडली. तसेच पवनचक्की महावितरणच्या विद्युत तारांवर पडल्यामुळे गावातील वीज पुरवठा काही तासांसाठी खंडित झाला होता. सुदैवाने पवनचक्की कोसळली त्यावेळी मंदिर परिसरात कुणीही उपस्थित नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. शनिवारी सकाळी स्थानिक ग्रामस्थ तसेच महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पवनचक्की बाजूला करण्याचे काम हाती घेतले होते. दरम्यान, अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे परिसरातील अनेक दुकानांचे फ्लेक्स, लोखंडी पाट्या तसेच रस्त्याच्या कडेला असलेल्या छोट्या-मोठ्या व्यावसायिकांच्या जाहिरात फलकांचेही नुकसान झाले. अनेक ठिकाणी फ्लेक्स उडून गेल्याच्या घटना घडल्या आहेत.



## अधिक महिन्यात समाजऋण फेडण्याची उत्तम संधी – प्रा. मुक्ता गरसोळे कुलकर्णी




**पुणे :** अधिक महिन्याचा काळ हा समाजऋण फेडण्याची उत्तम संधी आहे, असे प्रतिपादन निरूपणकार प्रा. मुक्ता गरसोळे कुलकर्णी यांनी केले. अधिक महिन्यानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्रेमनगर, बिबवेवाडी रोड येथील गणपती मंदिरात हा कार्यक्रम पार पडला. प्रा. कुलकर्णी म्हणाल्या, समाजातील उपेक्षित व वंचित घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यासाठी अधिक महिन्यात विशेष दानधर्माची योजना करण्यात आली आहे. धार्मिक कार्यासोबतच सामाजिक समरसतेचा संदेश देण्याचे कार्य या उपक्रमांतून होत असल्याचे त्यांनी सांगितले. आपण निवासी सोसायट्यांमध्ये पाण्याच्या टाकीची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करतो. त्याचप्रमाणे मनाच्या शुद्धतेसाठी संस्कृत स्तोत्रे आणि आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन आवश्यक आहे, असे सांगत त्यांनी अधिक महिना अर्थात पुरुषोत्तम मास याचे आधुनिक जीवनातील महत्त्वही उलगडून सांगितले. या व्याख्यानाला बिबवेवाडी व सातारा रोड परिसरातील श्रोत्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. प्रेमनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष बाळासाहेब कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जयमाला पायगुडे यांनी वक्त्यांची ओळख करून दिली. सहकार्यवाह मुकुंद सांगलीकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास सेवानिवृत्त न्यायाधीश जयंत देशमुख, रिझर्व्ह बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी नंदकुमार घाडगे, शिक्षिका अनिता चौधरी तसेच उपाध्यक्ष नीलिमा कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती.

## उमेदवारांने नामनिर्देशन दाखल कार्यपद्धतीबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

**पुणे :** महाराष्ट्र विधानपरिषद द्विवार्षिक निवडणुकीच्या २०२६ शांततेत, निर्भय आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी निवडणूक प्रचाराकरिता वापरण्यात येणारे वाहन, उमेदवारांने नामनिर्देशन दाखल करतावेळी अवलंब करावयाची कार्यपद्धती, मतपत्रिका छपाईच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा समावेश नसावा. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील, या व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या परिसरात नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळी मिरवणूक, सभा घेणे, घोषणा देणे, वाद्य वाजविणे किवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास निर्बंध घालण्यात आले आहे. फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रिन ग्लासच्यापुढे राहणार नाही आणि तो त्यावाहनाच्या टपापासून २ फुट उंधी पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनांवर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजूने लावण्यात यावा, इतर कोणत्याही बाजुस लावू नये. वाहनावर लावायचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधित पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमेदवार, प्रतिनिधी, निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहना व्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनांवर लावता येणार नाही. राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधीनी, त्यांच्या हितचिंतक, मुद्रणालयाचे मालक व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना पुढील बाबीवर निर्बंध घालण्यात येत आहेत. यामध्ये इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे नमूना मतपत्रिकेसाठी कागद वापरणे तसेच कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिकेची छपाई करणे. महाराष्ट्र विधानपरिषद द्विवार्षिक निवडणुकीच्या २०२६ शांततेत, निर्भय आणि न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने पुणे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये आदेश जारी केले आहेत, सदरचे आदेश २२ जून २०२६ पर्यंत अंमलात राहणार असून या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम २२३ तसेच इतर प्रचलित कायद्यांनुसार शिक्षेस पात्र राहील असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# आंबेगाव तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा

## देवदत्त निकम यांनी घटनास्थळी भेट देत केली पाहणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वळती :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शुक्रवारी सायंकाळी झालेल्या अवकाळी पावसाने मोठे नुकसान घडवून आणले आहे. वादळी वारा, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसामुळे पारगाव, लाखणगाव, काठापूर तसेच परिसरातील अनेक गावांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असून अनेकांच्या शेतीसह मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.



या अवकाळी पावसामुळे अनेक पोल्ट्री फार्मचे पत्रे उडून गेले, जनावरांचे गोठे कोसळले, शेतातील घरे आणि कांदाचाळींचे मोठे नुकसान झाले. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याने वीजवाहिन्यांचे नुकसान होऊन वीजपुरवठा खंडित झाला होता. तसेच वादळी वाऱ्यामुळे शेतीपिके आडवी झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती आलेला घास हिरावला गेला आहे. उन्हाळी पिके, भाजीपाला, फळबागा आणि साठवून ठेवलेला कांदाही पावसामुळे भिजून खराब झाला आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजूर वर्गाचे मोठे नुकसान झाले असून अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. काही ठिकाणी जनावरांचेही नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे शेतकरी वर्गामध्ये चिंता आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच देवदत्त निकम यांनी आज सकाळी बाधित भागांना प्रत्यक्ष भेट देत नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांची भेट घेतली. त्यांनी पारगाव, लाखणगाव आणि काठापूर परिसरातील विविध ठिकाणी जाऊन कोसळलेले गोठे, उद्ध्वस्त कांदाचाळी, नुकसानग्रस्त पोल्ट्री फार्म आणि शेतीपिकांची पाहणी केली. यावेळी पंचायत समिती सदस्या श्वेता ढोबळे या देखील उपस्थित होत्या.

निकम यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शासनाने तत्काळ मदत करावी तसेच नुकसानग्रस्तांना दिलासा मिळावा यासाठी प्रशासनाने त्वरित पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्याचे त्यांनी सांगितले. अतिरिक्त जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच तालुका पशुसंवर्धन अधिकारी यांच्याशी संपर्क साधून नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करण्याबाबत चर्चा केल्याची माहितीही त्यांनी दिली.

अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देणे आवश्यक आहे. प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता पंचनामे पूर्ण करून मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.रम्यान, अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतकरी वर्ग चिंतेत असून शासनाने तातडीने मदतीचा हात द्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## पुणे जिल्हा परिषद पतसंस्थेत ऐतिहासिक सत्तांतर

### नितीन शिर्के अध्यक्षपदी विराजमान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुणे जिल्हा परिषद सेवक सहकारी पतसंस्थेच्या पंचवार्षिक निवडणुकीत दीड दशकानंतर ऐतिहासिक सत्तांतर झाले आहे. अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या या निवडणुकीत 'परिवर्तन पॅनेल'ने २१ पैकी २० जागांवर दणदणीत विजय मिळवून एकहाती सत्ता काबीज केली. शुक्रवारी, २२ मे २०२६ रोजी पार पडलेल्या निवडणुकीत नवनिर्वाचित संचालकांमधून अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव या पदांची बिनविरोध निवड करण्यात आली.

**निवडीचा तपशील आणि नूतन पदाधिकारी**

निवडणूक निर्णय अधिकारी श्री. दिगंबर हौसारे यांच्या अध्यक्षतेखाली २२ मे २०२६ रोजी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत सर्व नवनिर्वाचित संचालकांच्या उपस्थितीत पदाधिकाऱ्यांची निवड प्रक्रिया पार पडली. यामध्ये नितीनजी शिर्के यांची अध्यक्ष (चेअरमन) म्हणून, हिना तांबोळी यांची उपाध्यक्ष (डेप्युटी चेअरमन) म्हणून, तर. नामदेव खंदारे यांची सचिव म्हणून बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निर्णयामुळे पतसंस्थेच्या कारभारात नवीन नेतृत्वाचा उदय झाला असून सभासदांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

**'परिवर्तन'चा ध्यास आणि दीड दशकाची प्रतीक्षा**

गेल्या १५ वर्षांपासून पतसंस्थेवर एकाच गटाचे वर्चस्व होते. मात्र, यंदाच्या निवडणुकीत जिल्हा परिषदेतील सहायक प्रशासन अधिकारी जगदीश महामुनी, आरोग्यसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दिलीप जगताप आणि परिचारिका संघटनेच्या राज्य अध्यक्षा मिनाक्षी मुदगल शिंदे यांच्या नेतृत्वाखालील 'परिवर्तन पॅनेल'ने सभासदांच्या समस्यांना





वाचा फोडली. कर्मचारी हिताचे मुद्दे आणि पारदर्शक कारभाराचे आश्वासन दिल्याने मतदारांनी भरघोस पाठिंबा देत परिवर्तन घडवून आणले.

**नूतन कार्यकारिणी (निवडलेले संचालक):**

सुनील जगताप, नामदेव खंदारे, सिद्धेश्वर गुंजकर, भरत सोदक, नितीन शिर्के, प्रदीप गोलांडे, उमाकांत सूर्यवंशी, शिवाजी मोहोळ, शंकर गवारी, दिलीप लोखंडे, राजेश शेरकर, वैभव तोंडे, गणेश शिंदे, मयूर काजरेकर, विजय बेडेकर, शेखर शिवरकर, अजय वत्रे, किशोर कुलकर्णी, सुलभा खोड आणि हिना तांबोळी.

**विकास आणि शिस्तीचा निर्धार**

निवडणूक निकालानंतर नूतन अध्यक्ष नितीन शिर्के यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, ''सभासदांनी आमच्यावर जो विश्वास टाकला आहे, तो सार्थ ठरवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. पतसंस्थेचा सर्वांगीण विकास करणे, सभासदांना कमी व्याजदरात कर्ज व अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे आणि संस्थेमध्ये आर्थिक शिस्त निर्माण करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. जुन्या त्रुटी दूर करून पतसंस्थेला आधुनिक आणि प्रगतीपथावर नेण्यासाठी आमची संपूर्ण टीम प्रयत्नशील राहील.'' हे परिवर्तन जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या सहकार चळवळीला कोणती नवी दिशा देते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आकृतीबंधासोबतच प्रशासकीय बदल्या कराव्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** कृषी विभागातील सन २०२६ च्या नियतकालिक प्रशासकीय बदल्या नवीन आकृतीबंधासोबत समायोजन पद्धतीने करण्यात याव्यात, तसेच तोपर्यंत बदली प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी कृषी विभागातील सर्व राजपत्रित व अराजपत्रित कर्मचारी संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे. उपकृषी अधिकारी संघटनेचे राज्याध्यक्ष संजय पाटील यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना याबाबत नुकतेच निवेदन दिले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ऋऋकृषी विभागामध्ये नवीन आकृतीबंधाचे काम सध्या प्रगतीपथावर असून विभागाची पुनर्रचना आणि पदांची फेररचना होण्याची शक्यता आहे.



अशा परिस्थितीत आकृतीबंध अंतिम होण्यापूर्वीच प्रशासकीय बदल्यांची प्रक्रिया राबविल्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम आणि मानसिक तणाव निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. राज्यातील कृषी विभागातील पाचही कर्मचारी संघटनांच्या राज्याध्यक्षांनी एकत्रितपणे प्रधान सचिव (कृषी) परिमल सिंह आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन आकृतीबंध आणि बदल्या या दोन्ही प्रक्रिया एकत्रित राबविण्याची मागणी केली आहे. दोन स्वतंत्र प्रक्रिया राबविल्यास प्रशासनातील सुसूत्रता विस्कळीत होण्याची शक्यता असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. नवीन आकृतीबंध मंजूर होण्यापूर्वी बदल्या पूर्ण झाल्यास, नंतर नव्या पदरचनेनुसार पुन्हा समायोजन किंवा बदल्या कराव्या लागू शकतात. त्यामुळे शासकीय वेळ आणि निधीचा अपव्यय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सध्या खरीप हंगाम पूर्वतयारी, राष्ट्रीय कृषी विकास योजना, जनगणना आणि इतर महत्त्वाच्या कामांचा ताण विभागावर आहे. अशा वेळी आकृतीबंध प्रलंबित ठेवून बदल्या केल्यास कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होण्याची भीती संघटनांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे नवीन आकृतीबंध तातडीने मंजूर करून त्यानुसार समायोजन पद्धतीने बदल्या करण्यात याव्यात. तोपर्यंत नियतकालिक प्रशासकीय बदल्यांना मुदतवाढ द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## लाखणगावातील कुटुंबांना शिवसेनेचा आधार

### अवकाळी पावसाने उद्ध्वस्त झालेल्या नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील लाखणगाव परिसरात झालेल्या अवकाळी मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. वादळी पावसाने अनेक नागरिकांची घरे कोसळली असून पोल्ट्री शेड, जनावरांचे गोठे आणि शेतीपिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकसानग्रस्त भागाला भेट देत नागरिकांना धीर दिला. शिवसेना नेते रमेशभाऊ येवले, पुणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अरूणभाऊ गिरे आणि युवासेनेचे कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर यांनी शिवसेना कार्यकर्त्यांसह लाखणगाव परिसरातील बाधित भागाची पाहणी केली. त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी व कुटुंबीयांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.अवकाळी पावसामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले असून पोल्ट्री व्यवसायिकांनाही मोठा



लाखणगाव ता. आंबेगाव येथील नुकसानग्रस्त कुटुंबांना मदत करताना शिवसेना ( शिंदे गटाचे) नेते रमेश येवले, अरूण गिरे, सचिन बांगर

आर्थिक फटका बसला आहे. या संकटाच्या काळात शिवसेनेच्या वतीने विविध नुकसानग्रस्त कुटुंबांना दोन लाख रुपयांहून अधिक आर्थिक मदत देण्यात आली. रमेशभाऊ येवले यांच्या हस्ते ही मदत प्रदान करण्यात आली. यावेळी प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकरी, पोल्ट्री व्यवसायिक आणि घरांचे नुकसान झालेल्या नागरिकांना शासकीय मदत त्वरित द्यावी, अशी मागणीही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली. संकटाच्या काळात शिवसेना सामान्य नागरिकांच्या पाठीशी कायम उभी राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यात युवासेना तालुका अध्यक्ष योगेश थोरात, माजी सरपंच महादेव कानसकर, मार्तंड टाव्हरे, नरेंद्र भागवत, किसन टाव्हरे, कारभारी गाडगे, महेश भोजने, भूषण रोडे, सोमनाथ भागवत, कैलास गाढवे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुसूचित जाती उपवर्गीकरणाला तीव्र विरोध; ३० जून रोजी मुंबईत विधानसभेला घेराव घालणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** अनुसूचित जातीच्या (डउ) 'अ, ब, क, ड' उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर राज्यातील दलित समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या संदर्भात 'बार्टी' (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) कडे आतापर्यंत सुमारे ८० हजार ई-मेल प्राप्त झाले असून, त्यापैकी ८५% म्हणजेच ६५ ते ७० हजार ई-मेल हे या उपवर्गीकरणाच्या विरोधात आहेत. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जाती उपवर्गीकरण पुनर्विलोकन समितीचे राहुल डंबाळे यांनी विशेष मोहीम राबवून उपवर्गीकरणावर तीव्र आक्षेप नोंदविले आहेत. आता हा लढा अधिक तीव्र करण्यासाठी ३० जून रोजी मुंबई येथे विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेला घेराव घालण्याचे आंदोलन पुकारण्यात आले आहे.३० जून रोजी मुंबईत होणाऱ्या या महा-घेराव आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी पुनर्विलोकन समितीच्या वतीने सध्या संपूर्ण महाराष्ट्रभर नियोजनाच्या बैठका सुरू आहेत. गाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर समाजबांधवांना एकत्र करून या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे. या बैठकांना राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून आंदोलनाची जय्यत तयारी सुरू आहे. विशेष मोहिमेला ७० हजार ई-मेलचा पाठिंबा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर राज्य सरकारने उपवर्गीकरणाचा अभ्यास करण्यासाठी समिती गठित करून जनतेकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या. राहुल डंबाळे यांच्या नेतृत्वाखाली राबविलेल्या विशेष मोहिमेमुळे अवघ्या काही दिवसांत बार्टीकडे हजारो आक्षेप नोंदवले गेले. एकूण आलेल्या ई-मेलपैकी ८५ टक्के जनतेने उपवर्गीकरणाच्या विरोधात कौल दिला आहे, जेणेकरून समाजाचा या निर्णयाला किती मोठा विरोध आहे हे स्पष्ट होते.समाजात फूट पडण्याची भीती आक्षेप नोंदवताना राहुल डंबाळे यांनी स्पष्ट केले की, 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण केल्यास अनुसूचित जाती अंतर्गत येणाऱ्या विविध उपजातींमध्ये अंतर्गत संघर्ष निर्माण होईल.

## १५००० फूट उंचीवर मराठी पाऊल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुरंदर :** हिमाचल प्रदेशातील अत्यंत कठीण समजल्या जाणाऱ्या १५ हजार फूट उंचीच्या बुराण घाटी शिखरावर सासवड येथील मेजर दीपक जांभळे आणि इंदापूर येथील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. लहू कदम यांनी यशस्वी चढाई करत मराठी पराक्रमाची छाप उमटवली आहे.

इंदापूर येथील ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. लहू कदम (वय ६६) आणि सासवड (ता. पुरंदर) येथील माजी जिल्हा समादेशक होमगार्ड पुणे मेजर दीपक जांभळे (वय ६२) यांनी सहा दिवसांच्या कठीण मोहिमेत हिमाचल प्रदेशातील ४५७२ मीटर (१५ हजार फूट) उंचीवरील बुराण घाटी शिखर सर केले.

हिमाचल प्रदेशातील शिमला आणि किन्नौर जिल्ह्यांच्या मध्यभागी असलेली बुराण घाटी ही अत्यंत रोमांचकारी आणि आव्हानात्मक दरी म्हणून ओळखली जाते. शिमलातील पब्बर व्हॅली आणि किन्नौरमधील सांगला (बास्पा) व्हॅली यांना जोडणारा हा मार्ग चीन सीमेजवळ असून अवघ्या ३० किलोमीटर अंतरावर सीमा क्षेत्र आहे.




उणे ५ अंश तापमान, सततचा पाऊस, बर्फवृष्टी आणि उंचीमुळे निर्माण झालेली ऑक्सिजनची कमतरता अशा प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत या दोघांनी ही मोहीम पूर्ण केली. द ट्रेकिंग हिमालया या संस्थेच्या माध्यमातून भारत, इंग्लंड आणि नेदरलँड येथील एकूण ११ गिर्यारोहकांसह ही मोहीम पार पडली.

१३ मे ते १९ मे २०२६ दरम्यान जांगलिक, दयाराथाच, लिथम, चंद्रनाहन तलाव, धुंधा मार्गे बुराण घाटी मोहिमेचा प्रवास झाला. अंतिम टप्प्यात धुंधा येथून पहाटे ३ वाजता ट्रेकला सुरुवात करण्यात आली आणि सकाळी ७ वाजता शिखर सर करण्यात आले.

बुराण घाटीच्या माथ्यावर ७० ते ८० अंश उताराची बर्फाची उंच भिंत पार करत दोरीच्या साहाय्याने त्यांनी धोकादायक उतार उतरून मुनीरंगकडे प्रस्थान केले. खराब हवामान, बर्फवृष्टी आणि ऑक्सिजनच्या कमतरतेवर मात करत त्यांनी ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली. गिर्यारोहकांची खरी परीक्षा घेणारे शिखर म्हणून बुराण घाटीची ओळख आहे.

विशेष म्हणजे वयाच्या साठीनंतरही हे दोघे नियमित ट्रेकिंग आणि सायकलिंग करत आहेत. डॉ. लहू कदम हे इंदापूरमध्ये सायकलवाले डॉक्टर म्हणून प्रसिद्ध असून त्यांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प, काश्मीर ग्रेट लेक्स, देवतिब्बा, हर की दून, कुवारी पाससह महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांवर यशस्वी गिर्यारोहण केले आहे.

# माऊली मंदिरातील दानपेटीतील रक्कम लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आळंदी पोलीस स्टेशन येथे ज्ञानेश्वर माऊली मंदिरातील दानपेटीतील रक्कम अपहार केल्याप्रकरणी मंदिरातील सेवकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विशाल बाळ वारुळे (वय ३३) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत ज्ञानेश्वर महादेव वीर (वय ४९), व्यवस्थापक, ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी देवाची यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल वारुळे हा ज्ञानेश्वर माऊली मंदिर येथे सेवक म्हणून कार्यरत होता. त्याच्यावर दानपेटीतील पैसे काढून कॅशियर रूममध्ये जमा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

दरम्यान, दिनांक १२ मे, १३ मे आणि १६ मे २०२६ रोजी

### सेवकाविरोधात गुन्हा दाखल

सायंकाळी पाच ते सात वाजण्याच्या दरम्यान आरोपीने दानपेटीतील रक्कम काढताना नजर चुकवून पैसे पोत्यामध्ये भरल्याचा आरोप आहे. त्यानंतर पोते बादलीमध्ये ठेवून त्यावर ट्रे ठेवण्यात येत असे. कॅशियर रूममध्ये नेल्यानंतर कपाटामागे पैसे लपवून त्यावर फुलांचे हार ठेवत असल्याचे तपासात समोर आले आहे.

तसेच, कॅशियर महेश गोपाळ गोखले यांना हार घेऊन जात आहे असा भास निर्माण करून आरोपीने तीन दिवसांत प्रत्येकी सुमारे पाच हजार रुपये, अशी एकूण १५ हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर फिर्याद मिळताच पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक खडके करीत आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक भिमा नरके यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.



द • ख • ल

## न्यू आर्ट्स कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**अहिल्यानगर :** न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयात सन २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (एच.एस.सी.) परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्रजी दरे होते. यावेळी बोलताना त्यांनी गुणवंत विद्यार्थी हे महाविद्यालयाचे खरे भूषण असून त्यांच्या यशामुळे संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध होत असते, असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल ९९.२८ टक्के लागला असून कु. प्रणाली कोठुळे हिने ८८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कॉमर्स शाखेचा निकाल ९१.७० टक्के लागला असून कु. क्षितिजा गायकवाड हिने ९२.३३ टक्के गुण मिळवत अव्वल स्थान पटकावले. कला शाखेचा निकाल ९२.८९ टक्के लागला असून कु. तनुजा सोनवणे हिने ८६.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. व्होकेशनल विभागाचाही निकाल ९७.३६ टक्के लागला असून चि. राम वाबळे याने ७९.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक संपादन केला. कनिष्ठ महाविद्यालयाचा एकूण निकाल ९५.९६ टक्के लागला आहे.

## शिक्षकांसाठी कॅशलेस आरोग्य योजनेचा मार्ग मोकळा

**अहिल्यानगर :** राज्यातील जिल्हा परिषद व खाजगी १०० टक्के अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत कॅशलेस वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. नुकत्याच निर्गमित करण्यात आलेल्या पत्रानुसार संबंधित प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आला असून या योजनेंतर्गत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लाख रुपयांपर्यंत आरोग्य संरक्षणाचा लाभ मिळणार आहे. या लाभार्थ्यांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचाही स्पष्टपणे समावेश करण्यात आला आहे. यासंदर्भात शिक्षक नेते प्रसाद शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देऊन राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समावेश करण्याची मागणी केली होती. त्यानंतर विविध लोकप्रतिनिधींची भेट घेऊन मुख्यमंत्री कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.भा पाठपुराव्यात दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले, शिक्षक आमदार किशोर दराडे, आमदार संग्राम जगताप, आमदार सत्यजित तांबे, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार किरण लहामटे, आमदार विक्रम पाचपुते तसेच आमदार काशिनाथ दाते यांचे सहकार्य लाभल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, या योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी आभा कार्ड काढणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच भविष्यात पाच लाख रुपयांपर्यंतच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीचे देयक स्वीकारले जाणार नसल्याने सर्वांनी तातडीने आभा कार्ड काढावे, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रसाद शिंदे म्हणाले, कॅशलेस आरोग्य योजनेमुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

# शब्दगंध संमेलनातून भाषा, साहित्य व संस्कृतीचे जतन : कृषिमंत्री भरणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शब्दगंध साहित्य संमेलनाच्या माध्यमातून गेल्या १६ वर्षांपासून सुरू आहे. त्यामुळे अशी साहित्य संमेलने ही काळाची गरज बनली आहेत, असे प्रतिपादन राज्याचे कृषिमंत्री भरणे यांनी केले.

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे, स्वागताध्यक्ष नगरसेवक सुरेश बनसोडे, आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे, नगरसेवक कुमार वाकळे, संपत बारस्कर, सुभाष लोंढे, सचिन जगताप, अविनाश घुले, प्रकाश भागानगरे, शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे आदी मान्यवर उपस्थित होते.



कृषिमंत्री भरणे म्हणाले, आजची तरुण पिढी मोबाईल आणि समाज माध्यमांमध्ये अधिक गुंतली आहे. अशा परिस्थितीत वाचन संस्कृती रुजविण्याचे कार्य साहित्य संमेलनातून होत आहे. 'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे तरुणांनी वाचनाची सवय जोपासली पाहिजे. वाचनामुळे विचार प्रगल्भ होतात आणि मानसिक समाधान मिळते.

यावेळी त्यांनी आपल्या कृषिमंत्रीपदाचा उल्लेख करताना, मी आधी शेतकऱ्याचा मुलगा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणि वेदना मला जवळून माहीत आहेत. कृषिमंत्री म्हणून मिळालेल्या संधीचे सोने करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे सांगितले.

संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांनी साहित्य आणि समाज यांचे नाते स्पष्ट करताना, साहित्य म्हणजे आपल्या भावनांचे प्रतिबिंब आहे. साहित्य आणि समाज या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. साहित्यिक, पत्रकार आणि कलावंतांनी आगामी काळात समाजातील जागल्याची भूमिका पार पाडली पाहिजे, असे आवाहन केले.

महापौर ज्योती गाडे यांनी शब्दगंध संमेलनामुळे साहित्य, संस्कृती आणि समाजातील नाते अधिक दृढ होईल, तसेच नव्या पिढीत वाचनाची आवड वाढेल, असा विश्वास व्यक्त केला. स्वागताध्यक्ष सुरेश बनसोडे यांनी शब्दगंधची साहित्य परंपरा भविष्यातही अधिक व्यापक होईल, असे सांगितले.

यावेळी प्रा. डॉ. गणी पटेल आणि सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांना 'शब्दगंध जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. उद्घाटनापूर्वी शाहीर भारत गाडेकर, वसंत डंबाळे, शेषराव पठाडे व सहकाऱ्यांनी शाहिरी जलसा सादर करून वातावरण भारावून टाकले.दीपप्रज्वलन व महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करून संमेलनाचे शानदार उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमासाठी साहित्य, शिक्षण, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बालरंगभूमी पुरस्काराने डॉ. सुधा कांकरिया यांचा गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडून बालरंगभूमी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा मानाचा बालरंगभूमी पुरस्कार यंदा ज्येष्ठ साहित्यिक, समाजसेविका व रंगकर्मी डॉ. सुधा कांकरिया यांना जाहीर झाला आहे. शंभर वर्षांहून अधिक परंपरा असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद या प्रतिष्ठित संस्थेकडून दरवर्षी १४ जून रोजी विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

राज्यस्तरीय कांकरिया करंडक बाल एकांकिका स्पर्धेच्या माध्यमातून गेल्या २५ वर्षांपासून बालकलाकारांमध्ये संस्कार, सर्जनशीलता, कलात्मकता आणि सामाजिक भान रुजविण्याचे कार्य डॉ. कांकरिया यांनी सातत्याने केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती नाट्य परिषदेचे मध्यवर्ती अध्यक्ष प्रशांत दामले यांनी दिली.




डॉ. कांकरिया यांच्या कार्यामुळे अनेक बालकलाकारांना योग्य व्यासपीठ मिळाले असून बालरंगभूमीला नवे आयाम प्राप्त झाले आहेत. बालनाट्य, साहित्य आणि सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्यही प्रभावीपणे केले आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अहिल्यानगर उपनगर शाखेच्या वतीने डॉ. सुधा कांकरिया यांच्या नावाचा प्रस्ताव मध्यवर्ती शाखेकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावास तत्काळ मान्यता देत पुरस्कार जाहीर करण्यात आला. या निमित्ताने त्यांचा सत्कारही करण्यात आला.

यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया, उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद बेडेकर, अमोल खोले, कार्याध्यक्ष पी. डी. कुलकर्णी, सहकोषाध्यक्ष शिरीष जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जठार, शैलेश देशमुख, स्नेहा रानडे, जयंत येलुलकर आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी डॉ. सुधा कांकरिया यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कला, साहित्य आणि संस्कार यांच्या सुंदर संगमातून समाज घडविणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा सन्मान होणे ही संपूर्ण रंगभूमीसाठी अभिमानाची बाब आहे, अशी भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.

## गार – कौठा येथे ७ किलोमीटर शिव रस्त्याचे यशस्वी सीमांकन

### अतिक्रमण मुक्त कारवाईला सुरुवात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यात शिव पानंद शेत रस्ता चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणखी एक ऐतिहासिक यश संपादन झाले आहे. दि. २२ व २३ मे रोजी गार – कौठा येथील तब्बल ६.५ ते ७ किलोमीटर लांबीच्या शिव रस्त्याचे यशस्वी सीमांकन करण्यात आले असून तात्काळ अतिक्रमण मुक्त कारवाईलाही सुरुवात करण्यात आली आहे.श्रीगोंदा–पारनेर उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर , तहसीलदार सचिन डोंगरे व भूमी उपाधीक्षक अविनाश मिसाळ यांच्या आदेशानुसार तसेच शिव पानंद शेत रस्ता चळवळीचे राज्य समन्वयक मा. दादासाहेब जंगले पाटील यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली मोजणी अधिकारी वासुदेव पाटील यांनी अत्यंत जबाबदारीने हे सीमांकन पूर्ण केले.त्याचबरोबर ग्राम महसूल अधिकारी रोहिणी करनोर मॅडम यांच्या उपस्थितीत तात्काळ अतिक्रमण मुक्त कारवाई सुरू करण्यात आली. अनेक वर्षांपासून रस्त्याअभावी पडीक पडलेल्या शेतजमिनींना आता वाहतुकीचा मार्ग उपलब्ध होणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.या कारवाईदरम्यान चळवळीचे राज्य समन्वयक मा. दादासाहेब जंगले पाटील, कायदे सल्लागार ॲड. गोरख कडूस, गार ग्रामपंचायतीचे उपसरपंच अनिल खरात, शांतीलाल खरात, गोरख खरात, बाळासाहेब शिपलकर, गणेश शिपलकर, पांडुरंग शिपलकर, जितू शेठ मगर, गार ग्रामपंचायत सरपंच संजय मगर, सचिन लोखंडे, दत्ता शिपलकर तसेच कवठा ग्रामपंचायतीचे सरपंच जीवनदादा शिपलकर, संदीप मगर, अनिल भाऊ मगर, भुजंग आप्पा शेळके, चंद्रकांत सूर्यवंशी, अमोल सूर्यवंशी, हनुमंत सूर्यवंशी, अशोक सूर्यवंशी, गारगाव तंटामुक्ती अध्यक्ष हौसेराव परकाळे, सुभाष लोखंडे, नामदेव शेळके, रील स्टार सुहास देव मुंडे, महेश कड, दत्ता शेळके, दीपक शिपलकर, हनुमंत थोरात, सुरेश लोखंडे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी सागर शिपलकर, मोहन तावरे, अक्षय खोमणे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## समप्रमाणात इंधन वाटप करा : जिल्हाधिकारी पंकज आशिया



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा सुरळीत पुरवठा राखण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. पेट्रोल, डिझेलचा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच प्रत्येक तालुक्यात इंधनाचे समप्रमाणात वाटप करावे, असे निर्दे श जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पेट्रोल, डिझेल पुरवठ्याबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. बैठकीस अपर जिल्हाधिकारी वैभव कलुबर्मे, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्यासह विविध कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच पेट्रोल डिलर्स असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले , पुणे व मनमाड येथील इंधन डेपो निर्धारित वेळेपेक्षा अधिक वेळ सुरू ठेवून जिल्ह्यातील पेट्रोल पंपांना इंधनाचा अविरत पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी. नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.इंधन वाटपावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पेट्रोल पंप परिसरात पोलीस गस्त वाढविण्यात यावी.जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर नागरिकांना सुरळीत सेवा मिळणे आवश्यक असून पेट्रोलपंप चालकांनी ग्राहकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. पुरवठा साखळी सक्षम ठेवणे तसेच नागरिकांना वेळेत इंधन उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयाने कार्य करण्यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.बैठकीत जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेल साठा, पुरवठा व्यवस्था, वाहतूक समन्वय तसेच विविध तालुक्यांतील इंधन उपलब्धतेबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला.

# शिष्यवृत्ती परीक्षेत राजमाता कन्या विद्यालयाची दमदार कामगिरी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या अंतरिम निकालामध्ये श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने घवघवीत यश संपादन करत आपले अव्वल स्थान कायम राखले आहे. विद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय गुण मिळवत शैक्षणिक गुणवत्तेचा ठसा उमटविला.

इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यालयातून १०४ विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी ६९ विद्यार्थिनी पात्र ठरल्या असून ३५ विद्यार्थिनी अपात्र राहिल्या. कोणतीही विद्यार्थिनी गैरहजर नव्हती. विद्यालयाचा निकाल ६६.३३ टक्के लागला.

पाचवीतील गुणवंत विद्यार्थिनींमध्ये भूमी दादा साळुंके हिने २४६ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. सान्वी सुधीर साबळे हिला २३८, सृष्टी काकासाहेब खोसे हिला २२४, श्रावणी उद्धव दिंडे हिला २२२, आरोही शरद तरटे व वैष्णवी रमेश हराळ या दोघींना २२० गुण मिळाले. तसेच अनन्या चंद्रशेखर उदार, वृंदावणी पद्माकर गिरमकर, शुभ्रा हंबीर म्हस्के, प्राची अजित बोरुडे, सलिहा जुबेर पठाण, वेदिका गणेश शेंडगे, अनन्या प्रसाद शिंदे, पायल रावसाहेब दांडेकर, मनस्वी वैभव सोनवणे, राजनंदिनी संदीप राऊत आणि ईश्वरी ज्ञानदेव पोळ यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

या विद्यार्थिनींना मराठी विषयासाठी राऊत एस. डी., गणितासाठी वाघचौरे एस. व्ही. (विभागप्रमुख), इंग्रजीसाठी घोडे पी. बी. तसेच बुद्धिमत्ता विषयासाठी गारुडकर एस. जी. यांनी मार्गदर्शन केले.

दरम्यान, इयत्ता आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही विद्यालयाने उल्लेखनीय यश मिळविले. या परीक्षेसाठी ८८ विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी ४५ विद्यार्थिनी पात्र ठरल्या असून ४० अपात्र राहिल्या, तर ३ विद्यार्थिनी गैरहजर होत्या. विद्यालयाचा निकाल ५२.९ टक्के लागला.




आठवीच्या गुणवंत विद्यार्थिनींमध्ये स्वरांजली संदीप भगत हिने २७४ गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. समृद्धी सचिन शेळके हिला २६८, नीता नितीन सप्रे हिला २६४, श्राव्या मच्छिंद्रनाथ लोखंडे हिला २६२, मयुरी लहू गांगर्डे हिला २६० गुण मिळाले. तसेच प्राची महेश खोत, आराध्या अमोल गांगर्डे, भार्गवी योगेश शेलार, समीक्षा संतोष शिंदे, तनिष्का संदीप राऊत, समीक्षा संतोष टकले, स्पंदन विजय वांगणे, परिनीती विक्रम वाघ, आचल निलेश देविकर, क्रांती राजेंद्र राऊत आणि मनस्वी नवनाथ ढवळे यांनीही उल्लेखनीय यश मिळविले.

या विद्यार्थिनींना मराठी विषयासाठी शिंदे के. डी., गणितासाठी खामकर के. जी. (विभागप्रमुख), इंग्रजीसाठी खेडकर डी. सी. तसेच बुद्धिमत्ता विषयासाठी कळसकर एस. एस. यांनी मार्गदर्शन केले.

विद्यालयाच्या या यशाबद्दल मुख्याध्यापिका वर्षा भोईटे, पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांच्यासह संस्थेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, विभागीय अधिकारी, सहाय्यक विभागीय अधिकारी, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, माता–पालक संघ, शिक्षक–पालक संघ तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी विद्यार्थिनी व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

## युवक आणि शेतकरी हितासाठी विधान परिषदेत आवाज बुलंद करणार : आ. विवेक कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शेतमालाला योग्य दर आणि बाजारभाव मिळाला पाहिजे, हीच आमची भूमिका आहे.वरिष्ठ सभागृहात शेतकरी हितासाठी सरकारकडे आग्रह धरणारा व युवकांचा हक्काचा प्रतिनिधी म्हणून काम करणार आहे.तुमच्या न्याय आणि हक्कासाठी आवाज उठवणारा घरातील व्यक्ती विधान परिषदेमध्ये गेलेला आहे, या माध्यमातून शेतकऱ्यांचे हिताचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार विवेक कोल्हे यांनी केले. सिन्नर तालुक्यातील पाथरे येथे गुरुवार दिनांक २१ मे २०२६ रोजी विधान परिषदेचे आमदार विवेक कोल्हे यांच्या नागरी सत्काराचा भव्य सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नाशिक जिल्ह्याचे खासदार राजाभाऊ वाजे उपस्थित होते. सत्कारमूर्ती म्हणून विधान परिषदेचे आ. विवेक कोल्हे यांचा ग्रामस्थांच्या वतीने मिरवणूक काढत सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे नेते भारत कोकाटे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र चव्हाणके, माजी पंचायत समिती सभापती बाळासाहेब वाघ, माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विठ्ठलराजे भोसले, शैक्षणिक क्षेत्रातील राजेश गडाख, प्रणवदादा पवार, कथले सर, अंबादास कदम आदीसह मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमास सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, पाथरे विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक, कोपरगाव येथील सहकार महर्षी शंकररावजी कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ, कोपरगाव नगरपालिकेचे उपाध्यक्ष जितेंद्र रणशूर व सर्व नगरसेवक, कोपरगाव बाजार समितीचे सभापती व संचालक मंडळ, शिवसेना तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर गाडे तसेच कार्याध्यक्ष पिराजी पवार यांची उपस्थिती लाभली. विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती व संचालक मंडळ, खरेदी–विक्री संघाचे उपाध्यक्ष व संचालक मंडळ, सिन्नर नगरपालिकेचे नवनिर्वाचित नगरसेवक, तसेच पंचाळे, मिरगाव, सायाळे, कोळगाव, झापेवाडी, विधनवाडी, शहा व कारवाडी येथील ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच व सदस्य मंडळ यांची उपस्थिती होती.

# नगरमध्ये पावसाची दमदार एन्ट्री

## एमआयडीसी परिसरात गारांच्या खच

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरात आज सायंकाळी मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावली. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अचानक ढगांचा गडगडाट होऊन पावसाच्या सरी कोसळल्या. दिवसभर उन्हाच्या कडाक्याने हैराण झालेल्या नगरकरांना मात्र या पावसाने गारवा निर्माण झाल्याने दिलासा मिळाला. नगर शहरात दिवसभर कडाक्याचे ऊन पडले होते. उन्हाळ्याचा कडाक्याने नगरकर हैराण झाले होते. त्यातच आज सायंकाळी अचानक पावसाचे ढग दाटून आले आणि मान्सूनपूर्व पावसाने आपल्या पहिल्याच एंट्रीमध दमदार पावसाची हजेरी लावली. अचानक सुरू झालेल्या पावसामुळे वाहनधारकांची चांगली तारांबळ उडाली. लहान मुलांनी मात्र पावसामध्ये भिजण्याचा मनमुराद आनंद लुटला. सायंकाळच्या सुमारास अचानक सोसाट्याचा वारा सुटला आणि पावसाला सुरुवात झाली. नगरच्या एमआयडीसी परिसरात असलेल्या साईबन या ठिकाणी अक्षरशः गारा कोसळल्या यामुळे परिसरात गारांचा खत निर्माण झाला होता. १५ ते २० मिनिटं चाललेल्या या पावसाने शहराच्या सखल भाग भागात पाणीच पाणी केले होते. शहरात असलेल्या काँक्रीटच्या रस्त्यामुळे रस्त्यावरून पाणी वाहताना दिसल्याने अनेकांना हायसे वाटले. दिवसभर उन्हामुळे होणारी अंगाची लाही लाही आणि त्यातच सायंकाळच्या सुमारास पावसाने लावलेली हजेरी यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. त्यामुळे नगरकरांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. नगरमध्ये पावसाने हजेरी लावल्याने आता पावसाला सुरुवात होणार या आशेने परिसरातील शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## सावरगावतळच्या सुनबाईचा नॉर्वेत पंतप्रधानांकडून गौरव



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर प्रतिनिधी :** तालुक्यातील सावरगाव तळ येथील रहिवासी असणाऱ्या आणि नॉर्वेतील ओस्लो बहुराष्ट्रीय कंपनीचे वरिष्ठव्यवस्थापक साहेबराव गेनू नेहे यांच्या पत्नी आणि निमज येथील शांताराम शंकरराव डोंगरे यांच्या कन्या सौ. रेश्मा साहेबराव नेहे पाटील यांना नॉर्वे या देशात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर भारतीय शास्त्रीय संगीत नृत्य सादर करण्याचा बहुमान मिळाला. हा क्षण सावरगावतळसाठी आणि खांडगाव साठी तसेच संपूर्ण तालुक्यासाठी अत्यंत गौरवास्पद आहे

पंतप्रधान मोदी हे पाच देशांच्या परदेश दौऱ्यावर असून या दौऱ्यात त्यांनी नॉर्वे या देशालाही भेट दिली. राजधानी ओस्लो येथे त्यांचा नॉर्वेच्या सर्वोच्च नागरी सन्मान ग्रँड क्रॉस ऑफ द रॉयल नॉर्वेजियन ऑर्डर ऑफ मेरिट देऊन गौरव करण्यात आला. यावेळी भारतीय सांस्कृतिक परंपरेनुसार त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. या स्वागत सोहळ्या मध्ये मूळच्या सावरगाव तळ येथील रहिवासी रेश्मा नेहे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना शास्त्रीय नृत्य सादर करण्याची संधी मिळाली. त्यांनी भरतनाट्यम,कुचिपूडी,ओडिसी , कथक आणि मोहिनीअट्टम या भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांचे आकर्षक सादरीकरण केले. भारतीय संस्कृती आणि परंपरेचा सुंदर आविष्कार पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी चांगलेच भारावून गेले .

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री




## गोदावरीतील बेकायदा वाळूवाल्यांवर धाडकेबाज कारवाई, मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : गोदावरी नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळूचा उपसा व चोरटी वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांच्या विरोधात तालुका पोलिसांनी सलग दोन – कारवाया केल्या आहेत. तालुक्यातील जाफराबाद – आणि जुने नायगाव शिवारात केलेल्या या कारवाईत पोलिसांनी दोन हायवा ट्रक, एक जेसीबी मशीन व सुमारे १२ ब्रास वाळूसह एकूण ७३ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यात ६ जणांवर गुन्हे दाखल केले आहे.

पहिली कारवाई सोमवारी (ता. १८) रोजी सायंकाळी जाफराबाद शिवारातील गोदावरी नदीपात्रात करण्यात

आली. पोलिस आल्याची चाहूल लागताच आरोपी वाळू खाली करून वाहने सोडून पळून गेले.या प्रकरणी पोलिस हवालदार रामेश्वर ढोकणे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळावरून ३० लाख ६० हजारांचे दोन विना नंबरचे ट्रक आणि ६ ब्रास वाळू जप्त करण्यात आली. याप्रकरणी बापू चिखले, योगेश घंगाळे, विशाल निकम व विजय कुंजीर (सर्व रा.वैजापूर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून, तेथून पसार आहेत.



दुसरी कारवाई गुरुवारी (ता.२१) दुपारी जुने नायगाव शिवारात करण्यात आली. उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाचे पोलिस हवालदार सुनील शिंदे यांच्या पथकाने जेसीबीच्या साहाय्याने हायवा डंपरमध्ये बेकायदा वाळू भरताना आरोपींना रंगेहात पकडले.या कारवाईत ४२ लाख ६० हजार रुपये किमतीचा टाटा कंपनीचा हायवा डंपर, एक जेसीबी मशीन आणि ६ ब्रास वाळू जप्त करण्यात आली. याप्रकरणी आरोपी शुभम भाऊसाहेब पवार (रा. श्रीरामपूर) आणि सुरेश सुदाम आहेर (रा. सावळी विहीर) यांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला.

दोन्ही कारवायांमध्ये श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्याचे प्रभारी निरीक्षक अरुण धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पुढील तपास करत आहेत. पोलिसांनी केलेल्या या सलग कारवायांमुळे वाळूतस्करांचे धाबे दणाणले आहेत.

## अपहृत तरुणाची सुटका करताना पोलिसांवर जीवघेणा हल्ला

### विक्रांत भालसिंग गंभीर जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : एका तरुणाच्या अपहरणाची माहिती मिळताच त्याला सुखरूप सोडवण्यासाठी जीवाची पर्वा न करता धाव घेतलेल्या पोलिसांवरच आरोपींनी हल्ला केल्याची धक्कादायक घटना नगर तालुका परिसरात घडली. या हल्ल्यात पोलीस कर्मचारी विक्रांत भालसिंग गंभीर जखमी झाले असून पोलिसांनी पाच आरोपींना ताब्यात घेतले आहे. दहिगाव साकत येथील सचिन कार्ले यांनी शुक्रवारी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत भाऊ आकाश कार्ले याचे अपहरण झाल्याची माहिती दिली.

गुरुवारी रात्री काही अज्ञात इसमांनी आकाशला घरातून जबरदस्तीने स्कॉर्पिओमध्ये बसवून पळवून नेले होते. त्यानंतर आरोपींकडून आकाशच्या मोबाईलवरून फोन करून कुटुंबियांकडे ९० हजार रुपयांची खंडणी मागण्यात येत होती. पैसे न दिल्यास आकाशचा खून करण्याची धमकीही देण्यात आली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. मोबाईल लोकेशनच्या आधारे आकाश कोल्हार परिसरात असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलीस कर्मचारी विक्रांत भालसिंग, खंडेराव शिंदे व दोन होमगार्ड यांचे पथक तातडीने घटनास्थळी रवाना झाले. कोल्हार येथील एका हॉटेलमध्ये कैद करून ठेवलेल्या आकाशची सुटका करण्याचा प्रयत्न सुरू असतानाच आरोपींनी पोलिसांवर अचानक हल्ला चढवला. या झटापटीत विक्रांत भालसिंग यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली, तर खंडेराव शिंदे किरकोळ जखमी झाले. घटनेनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ विशेष पथके रवाना करत संयुक्त कारवाई केली. पोलिसांनी पाच आरोपींना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. जखमी भालसिंग यांच्यावर अहिल्यानगर येथील रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## वळदगावात जबरी चोरी; सव्वा दोन लाखांचा ऐवज लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : घरात एकट्या असलेल्या पाहून तिघांनी महिलेला आणि मुलाला गळ्याला चाकू लावून सव्वा दोन लाखांचे दागदागिने व रोख रक्कम चोरून नेण्याची घटना शुक्रवारी सांयकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास घडली. तालुक्यातील वळदगाव येथील गोपाळ वस्तीवर शिवारात येथे घडली.विशेष म्हणजे वर्दळीच्या ठिकाणी घटना घडली.याबाबत मेघा गोरख नवगिरे (रा.वळदगाव )यांनी दिलेल्या श्रीरामपूर शहर पोलिसांना फिर्यादीवरून मी, व माझे पती, एक मुलगी एक मुलगा येथे कुटूंब राहत आहेत.

माझ्या पतीचे श्रीरामपूर शहरालगत वाहनांचे गॅरेज दुकान असून ते चालवून



आम्ही आमचे कुटूंबाचे उदरनिर्वाह चालवितो. शुक्रवारी (दि.२२) मे रोजी सांयकाळी साडे आठ वाजेच्या दरम्यान,एकटी घरात स्वयपांक करीत

> अन् 'मुलाला' जेवन करित असताना चोरट्यांनी ताब्यात घेऊन जीवे मारली अशी धमकी दिल्याने कपाट उघडण्यास भाग पाडले, त्या भितीपोटी एकटी असलेल्या महिलेला सोने, दागिने, रोख रक्कम चोरून नेण्यास चोरटे यशस्वी झाले.त्यावेळी एका अंगात टि शर्ट आणि काळ्या रंगाची पॅन्ट होती त्यांच्या तोंडाला मास्कही लावले होते.

असताना अज्ञात तोंडाला बांधलेले तीन इसम मागच्या दरवाज्याने घरात घुसले.त्यातील माझ्या एकाने गळ्याला चाकू धाक दाखवून खाली पाडले.

गळ्यातील पोत चाकूने तोडून घेतली यातील दोघे अज्ञात अनोळखी इसमाने बंदुकीसारखे काहीतरी हत्यार काढून जीवे मारण्याची धमकी देऊन कपाटातील एक लाख वीस किंमतीचे तीन तोळ्याचे सोन्याचे गंठण,चाळीस हजार किंमतीचे एक तोळ्याचे सोन्याचे नेकलेस अठ्ठावीस हजार किंमतीचे सात ग्रॅम सोन्याचे झुबे सहा हजार रुपयांचे किंमतीचे दीड ग्रॅम सोन्याचे झुबे,रोख रक्कम पंचवीस हजार एकूण दोन लाख एकोणीस मुद्देमाल असा एकूण ऐवज अज्ञात चोरट्यांनी लुटून नेला.याप्रकरणी तीन अनोळखी अज्ञात इसमाविरुद्ध बी एन एस २०२३ प्रमाणे, ३०९ (४), ३३३,११५, (२) ३५१,( २) ३ (५), प्रमाणे श्रीरामपूर शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.अधिक तपास श्रीरामपूर शहर पोलीस करीत आहे.

पोलिसांनी तपासाकामी चक्रे वेगाने फिरवित एकास इसमास ताब्यात घेतल्याची माहिती मिळाली असून त्यांची चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले.मात्र परिसरात पोलिसांची पेट्रोलिंग होण्याचे आवश्यकता असून ग्रामपंचायतीने ग्रामसुरक्षा यंत्रणा व दल नेमण्याची ही मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान अहिल्यानगर येथून मोबाईल फॉरेन्सिक लॅब व्हॅन तपासाकामी बोलवून त्याकामी घटनास्थळीवरील ठसे घेण्यात आले.त्यानंतर घटनास्थळापासून श्वान पथकाने चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला.मात्र काही पुरावा मिळून आलेला नाहीत.

## घरासमोर उभा ट्रक अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : घरासमोर उभा केलेला ट्रक अज्ञात भामट्यांनी चोरुन नेल्याची घटना दि. १४ मे रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. सुर्यकांत बाळु वाघ, वय ४९ वर्षे, रा. तांदुळवाडी, रेल्वे स्टेशन, राहुरी, यांनी सन २०१७ मध्ये टाटा कंपनीचा ट्रक नं. एम एच १५ इजी ०६८५ ही ट्रक ट्रान्सपोर्ट करिता घेतली होती. सदर ट्रक घरासमोर लावलेला होता. दि. १४ मे २०२६ रोजी सकाळी सुर्यकांत वाघ व त्यांच्या पत्नी दोघेजण कामानिमित्त बाहेर गावी गेले होते. ते रात्री १० वाजेच्या सुमारास घरी आले. तेव्हा घरासमोर लावलेला ट्रक त्यांना दिसला नाही. तेव्हा सुर्यकांत वाघ यांनी आजुबाजुला ट्रक बद्दल विचारपुस करून शोध घेतला. मात्र ट्रक मिळुन आला नाही. तेव्हा त्यांची खात्री झाली की, घरासमोर लावलेला ट्रक कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला आहे. सुर्यकांत बाळु वाघ यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात भामट्यांवर गुन्हा रजि. नं. ५६३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## खोकर फाट्यावर एकास लुटले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खोकर फाटा येथे थकबाकी आणायला गेलेल्या क्रेन ड्रायव्हरला रस्त्यात अडवून त्याच्याकडून २४ हजाराची रक्कम लुटून नेण्याचा प्रकार काल शुक्रवारी साडे सहा वाजेच्या दरम्यान प्रकार घडला.याबाबत अच्छेलाल जनार्धनराव यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आपण अण्णासाहेब गवारे यांच्या क्रेनवर ड्रायव्हर म्हणून काम करतो.काल खोकरफाटा येथे पैसे आणण्यासाठी आपण गेलो होतो. त्या ठिकाणाहून २४ हजाराची रक्कम घेऊन आपण ठिक.६.३० वाजता मोटारसायकलवरुन परत येण्यासाठी निघालो असता, दोघांनी आपल्याला आडवले व गाडीवर फायनान्स आहे का? अशी चौकशी केली, तेव्हा आपण मालकाला फोन लावून दिला तेथून थोड्याच अंतरावर पुढे गेल्यावर दोघा अनोळखी इसमांनी आडवूनाचे कारण नसताना शिवीगाळ करत आपल्या खिशातील २४ हजार रुपये काढून घेतले, लाल रंगाच्या पल्सरवर हे दोघे लुटारु येथून पळून गेले. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## संरक्षण मंत्री ना. राजनाथ सिंग यांचे आ. काळे यांनी केले स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : देशाचे कर्तव्यदक्ष संरक्षण मंत्री ना. राजनाथ सिंग व राज्याचे कार्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अहिल्यानगर दौऱ्यावर आले असता आ. आशुतोष काळे यांनी शिर्डी येथे कोपरगाव मतदारसंघातील नागरिकांच्या वतीने त्यांचे स्वागत केले. शिर्डी– सावळीविहीर (एम.आय.डी.सी.) येथे आयोजित क्षेपणास्त्र संकुल व तोफगोळा (आर्टिलरी शेल) उत्पादन प्रकल्प लोकार्पण सोहळ्यासाठी देशाचे संरक्षणमंत्री ना. राजनाथजी सिंग साहेब व राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता आमदार आशुतोष काळे यांनी शिर्डी येथे त्यांचे कोपरगाव मतदारसंघाच्या वतीने स्वागत केले. यावेळी विधान परिषदेचे सभापती ना. प्रा. राम शिंदे, जिल्ह्याचे पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील आदी सह विविध मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.



## दोन घरांचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अज्ञात भामट्यांनी राहुरी तालुक्यातील गडधे आखाडा येथे दि. २२ मे रोजी पहाटेच्या सुमारास शेजारी शेजारी असलेल्या दोन घराचे कुलूपे तोडून घरात प्रवेश केला. नंतर घरातील सामानाची उचकापाचक करुन सोन्याचे दागीने व रोख रक्कमेचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली. भागवत कोंडीराम कोळसे, वय ७२ वर्षे, हे राहुरी तालुक्यातील गडधे आखाडा येथे राहत असून त्यांचा मुलगा सटवाजी कोळसे हे त्यांच्या शेजारीच रहावयास आहे. सटवाजी कोळसे हे कामानिमित्त बाहेर गावी गेल्याने त्यांच्या घराला कुलुप लावलेले होते. दि. २२ मे २०२६ रोजी पहाटे ३ वाजे दरम्यान भागवत कोळसे व त्यांची पत्नी घराला कुलुप लावुन घरा समोरील पटांगणात झोपले होते. दरम्यान अज्ञात भामट्यांनी भागवत कोळसे व सटवाजी कोळसे या दोघांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील सामानाची उचकापाचक केली. आणि दोन्ही घरातील मिळुन १ तोळा सोन्याचे दागीने व २० हजार रुपए रोख रक्कम, तसेच एक इलेक्ट्रॉनिक मशिन असा मुद्देमाल भामट्यांनी चोरुन नेला. भागवत कोळसे यांच्या पत्नी पहाटे झोपेतून उठल्या. तेव्हा त्या घरात गेल्या असता घरात चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. यावेळी कोळसे यांनी घराच्या आजूबाजूला पाहणी केली असता घरापासून काही अंतरावर पेटी व काही कपडे पडलेले दिसून आले. भामट्यांनी पेटीमधील मुद्देमाल चोरुन नेला होता. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. भागवत कोंडीराम कोळसे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलीस ठाण्यात अज्ञात भामट्यांवर गुन्हा रजि. नं. ५६०/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## भांडण सोडवायला गेलेल्या आई–मुलावर हल्ला ; महिलेचा विनयभंग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : भांडण सोडविण्यास गेलेल्या आई व मुलाला शिवीगाळ करून लाकडी काठी तसेच लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत महिलेचा विनयभंग केल्याची धक्कादायक घटना दि. १६ मे रोजी सायंकाळी राहुरी तालुक्यातील डिग्रस परिसरात घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक ५५ वर्षीय महिला आपल्या कुटुंबासह डिग्रस परिसरात वास्तव्यास आहेत. दि. १६ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजेच्या दरम्यान आरोपींचे आपसात भांडण सुरू होते. हा वाद मिटवण्यासाठी संबंधित महिला व त्यांचा मुलगा मध्यस्थी करण्यासाठी गेले होते.

यावेळी आरोपींनी आई व मुलाला अश्लील शिवीगाळ करत लाकडी काठी तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. दरम्यान, संबंधित महिलेचा विनयभंग करत तिच्या गळ्यातील अर्धा तोळे वजनाची सोन्याची पोत जबरदस्तीने तोडून घेतल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच, पुन्हा आमचे भांडण सोडविण्यास आलात तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकीही आरोपींनी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर पीडित महिलेने राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी देविदास दत्तू कोळेकर व योगिता देविदास कोळेकर, दोघे रा. डिग्रस, ता. राहुरी, यांच्याविरुद्ध गुन्हा रजि. नं. ५४५/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ७४, ११९ (१), ११८ (१), ११५ (२), ३५१ (२) व ३५२ अन्वये मारहाण, धमकी व विनयभंगाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार विकास वैराळ हे करीत आहेत.

## आंबीत एका चोरट्यांस ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आंबी** : विहिरीतील मोटारी व केबल चोरणाऱ्या तीन चोरट्यापैकी एकास चोरट्यास ग्रामस्थांनी रंगहोथ पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले.यातील दोन चोरटे घटनास्थळापासून अधाराचा फायदा घेऊन पसार झाले.सदरची घटना राहुरी तालुक्यातील आंबी येथे (दि.२२) मे रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहिती अशी की, शेतकरी शरद बापुसाहेब डुकरे यांची शेती आहे. शरद डुकरे हे घरी असताना त्यांना विहिरीजवळ संशयित इसम दिसून आले. त्यावेळी शरद डुकरे यांनी राजेंद्र व सुभाष डुकरे, भाऊराव टाकसाळ यांना सोबत घेऊन त्यांच्या विहिरी जवळ गेले. तेथे त्यांना विहिरी जवळ दिसून आले. त्यातील दोघे जण मोटारसायकल जागीच तेथे अंधाराचा फायदा घेवुन पळाले.यातील ग्रामस्थांनी एकास चोरट्याला रंगहोथ पकडले. त्यास नाव व गाव जमीर जहागीर शेख, (वय २९ रा. चंदनझीरा, जालना), असे सागितले.

त्याबरोबर असलेल्या इतर दोन पळुन गेलेल्या इसम अक्षय देठे, (रा. राहुरी फॅक्टरी), व अन्य एका अज्ञात इसम आहे, अशी माहिती त्याने दिली. त्याने विहीरीवरची पाणबुडी मोटार व केबल चोरी करण्यासाठी येथे असल्याची कबूली दिली.यावेळी ग्रामस्थांनी चोरट्यास ताब्यात दिले असून पकडलेल्या चोरट्याविरूध्द शेतकरी शरद बापुसाहेब डुकरे यांच्या फिर्यादीवरून तीन जणांवर गुन्हा रजि. नं. ५६५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३ (५), ३०३ (२), ६२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

## तिगाव येथील दुर्घटनेतील मृत भावांच्या कुटुंबीयांची आ. खताळांनी घेतली भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील तिगाव येथे दगडाच्या खाणीत साचलेल्या पाण्यात बुडून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवारी घडली. या दुर्घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

या घटनेची माहिती मिळताच आमदार अमोल खताळ यांनी शनिवारी तिगाव येथे भेट देत सानप कुटुंबीयांचे सांत्वन केले. महेश गोरक्षनाथ सानप (वय १८) आणि ओंकार गोरक्षनाथ सानप (वय १४) अशी मृत भावांची नावे आहेत. दोघेही दगडाच्या खाणीत साचलेल्या पाण्यात पोहण्यासाठी गेले असता ही दुर्घटना घडली. यावेळी आमदार खताळ यांनी कुटुंबीयांना धीर देत शासन स्तरावरून मिळणारी आर्थिक मदत तसेच विविध योजनांमधून शक्य ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. त्यांनी तहसीलदार धीरज मांजरे यांच्याशी चर्चा करून घटनेची सविस्तर माहिती घेण्याच्या



सूचना दिल्या. तसेच प्रशासनाने तातडीने पंचनामा व इतर आवश्यक कार्यवाही पूर्ण करून कुटुंबीयांना मदत द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. या प्रसंगी ग्रामस्थ, महायुतीचे पदाधिकारी, सानप कुटुंबीयांचे नातेवाईक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, आमदार खताळ यांनी खोल पाण्याच्या ठिकाणी पोहण्यासाठी जाणे टाळण्याचे आवाहन करत पालकांनी मुलांच्या सुरक्षिततेबाबत अधिक जागरूक राहण्याची गरज व्यक्त केली. भविष्यात अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

## गायीला राष्ट्रीय पशु म्हणून घोषित करा श्रीरामपुरातील मुस्लिम समाजाची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : सर्व धर्मात आदराचे स्थान असणाऱ्या गायी ला राष्ट्रीय पशु म्हणून घोषित करण्यात यावे अशी मागणी शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आली असून याबाबत तहसीलदार, श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की,जमियत उलेमा–ए–हिंद व दारुल उलूम देवबंदचे मौलाना अरशद मदनी यांनी देशात सामाजिक सौहार्द,बंधुता आणि परस्पर आदर वाढावा या हेतूने गाय राष्ट्रीय पशू घोषित करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या या विचारांना समर्थन देत श्रीरामपूरमधील मुस्लिम समाजाने प्रशासनाकडे मागणी नोंदवली आहे.

निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, गाय ही भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असून शेती व्यवस्था, दुग्ध उत्पादन तसेच पर्यावरणीय संतुलन राखण्यात तिचे मोठे योगदान आहे. विविध धर्मांमध्येही गायीला विशेष स्थान आहे. त्यामुळे देशात एकात्मता आणि सामाजिक सलोखा वाढवण्यासाठी हा निर्णय उपयुक्त ठरेल असे मत व्यक्त करण्यात आले आहे.




संविधान बचाव समितीचे अध्यक्ष अहमद जहागीरदार याच्या नेतृत्वाखाली असलम बिनसाद, जोएफ जमादार, तौफिक शेख, मुन्ना पठाण, रज्जाक पठाण, लकी सेठी, डॉ.सलीम शेख, डॉ.अफरोज तांबोळी, डॉ. मुजाहिद सय्यद, डॉ. मोहम्मद शफी, इम्रान पठाण, रज्जाक शेख, नाजीश शाह,एडवोकेट कुमार भिंगारे, ड. मोहन आदी समाजातील सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असून प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन शासन स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी, अशी विनंती देखील निवेदनात करण्यात आली आहे.




|| भावपुर्ण श्रद्धांजली ||

मा.संचालक – स.म.शि.ना.ना.स.सा.का. व
मा.चेअरमन – मढेवडगाव सेवा संस्था सोसायटी

**कै.नामदेव (तात्या) मुरलीधर शिंदे**

शनिवार दि.१६/०५/२०२६ रोजी यांना देवाज्ञा झाली असुन त्यांचा

|| दशक्रिया विधी ||

सोमवार दि.२५/०५/२०२६ रोजी सकाळी ७.00 वा

स्थळ : मढेवडगाव(भैरवनाथ मंदिरामागे) ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर येथे होईल.

|| ईश्वरी सत्तेपुढे इलाज नाही. त्यांच्या आत्यास चिरशांती व सदगती लाभो ही परमेश्वर चरणी प्रर्थना ||

|| दुखांकित ||

**ग्रामपंचायत कार्यालय मढेवडगाव, ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर**

श्री.प्रमोद नामदेव शिंदे – सरपंच
सौ.सुनिता दत्तात्रय उंडे – उपसरपंच
श्री.खाडे डब्लू.ए. – ग्रामविकास अधिकारी

कार्यकारी सभासद

श्री.राजकुमार महादेव उंडे
श्री.राहुल भाऊसाहेब साळवे
श्री.योगेश गोपीनाथ शिंदे
सौ.अमृता आनंदा ससाणे
सौ.सोनाली नवनाथ उंडे
सौ.मंगल गोरख गोरे
श्री.अभयसिंह संतोषकुमार गुंड
सौ.रंजना बबन गोरे
श्री.संतोष नारायण गायकवाड
सौ.रेश्मा राहुल शिंदे
श्री.योगेश अंबादास मांडे
सौ.सुरेखा बाळासाहेब फापाळे

सर्व सदस्य व ग्रामस्थ

प्रवचन सेवा : ह.भ.प. सर्जेराव महाराज काळे यांचे प्रवचन सकाळी ७.00 वाजता होईल.